# हुतात्मा बहिर्जी

## हैदराबाद संस्थान स्वातंत्र्य संग्रामातील
## एका तेजस्वी बलिदानाची कहाणी



– प्रा. शाम अग्रवाल

Bahirji Smarak Mahavidyalaya Basmath
Dist. Hingoli

# हुतात्मा बहिर्जी

हैदराबाद संस्थान स्वातंत्र्य संग्रामातील
एका तेजस्वी बलिदानाची कहाणी

प्रा. शाम अग्रवाल

प्रकाशक
सर्वोदय मित्रमंडळ
वसमतनगर जि.परभणी

द्वितीयावृत्ती
१९ जुलै १९९८
हुतात्मा बहिर्जी पुण्यतिथी

मुखपृष्ठ
इब्राहिम
वसमतनगर

मुद्रक
विजय प्रिंटींग प्रेस
वसमतनगर

सर्व हक्क स्वाधीन

मूल्य वीस रुपये

१

# बहिर्जी : पूर्वचरित्र

परभणी जिल्ह्यातील वसमत तालुक्यात पूर्णा - हिंगोली रेल्वे मार्गावरील सिरळी स्टेशनपासून पूर्वोत्तर दीड मैलावरील एक चिमुकले खेडे. डोंगर टेकड्यांनी संपूर्णपणे वेढलेले. डोंगरांची जणू कांही एक नैसर्गिक तटबंदीच उभारलेली. या डोंगररांगांच्या उतरणीवरून वाहत आलेले कांही ओहळओढे या खेड्याच्या अवतीभवती अस्ताव्यस्तपणे घरंगळत गेलेले. पावसाळ्यात डोंगराच्या एखाद्या उंच शिखरावर उभे राहून इकडे तिकडे नजर फिरवली म्हणजे एकूण हिरव्याकंच पार्श्वभूमीवर दिसणाऱ्या या ओहळओढ्याच्या वाकड्यातिकड्या रेघोट्या आणि हा एक गावचा लहानसा पुंजका कांही औरच सौंदर्याने नटलेला दिसतो. या अनोख्या निसर्ग सुंदर गावाचे नाव आहे वापटी. शंभर पाऊणशे घरांची वस्ती. हजार आठशेची लोकसंख्या असावी. बहुतेक लोक मराठा शिन्दे. मराठेशाहीतील मातब्बर सरदार महादजी शिन्देकडे पूर्वज म्हणून अभिमानपूर्वक बोट दाखविणारे आणि ग्वाल्हेरच्या गतवैभवाचा दिमाख मिरविणारे. कांही धनगर, माळी आणि दलितांची घरे. सर्वजण मिळून मिसळून आणि एकोप्याने राहणारे. गावची आर्थिक स्थिती बेताबाताचीच. सर्वच लोक स्वतः शेती कसणारे. गावात मोठा जमीनदार कोणीच नाही. प्रत्येक कुटुंबाला पाच-दहा-पंधरा एकर पर्यंत जमीन. बहुतेक जमीन माळाची कोरडवाहू आणि संपूर्णपणे नैसर्गिक पाण्यावर अवलंबून असेलली. माळरान असल्यामुळे विहिरी आणि पाण्याने भरलेल्या विहिरींची वानवाच. शेतीत खूप कष्ट करून, घाम गाळून मशागत करावी. पावसाळा आला म्हणजे आकाशाकडे डोळे लावून बसावे. त्याची कृपा झाली तर हिरव्यागार ज्वारीच्या ताटाबरोबर

आपणही आनंदाने डोलावे. कापसाच्या पांढऱ्याशुभ्र बोंडासारखे मनोमन फुलावे, हसावे. नसता निव्वळ डोळ्यातून पाणी काढीत बसावे. अशी एकूण परिस्थिती.

आडवाटेवर पडलेल्या या वापटी गावाला भारतीय स्वातंत्र्यानंतर एक आगळे महत्व आले. हैदराबाद संस्थान मुक्ती आंदोलनात जुलमी निझामी पोलीस आणि अत्याचारी रझाकाराविरुद्ध आजेगावच्या रणसंग्रामात समोरासमोर लढता लढता येथील एक शूर शेतकरी तरुण बहिर्जी शिंदे हुतात्मा झाला. त्याच्या तेजस्वी बलिदानाने उर्जस्वल इतिहास घडविला. विशाल भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासात हुतात्मा बहिर्जी शिन्दे आणि वापटीचे नाव सुवर्णाक्षरांनी कायमचे कोरले गेले.

बहिर्जीचा जन्म वापटी येथे इसवीसन १९२० साली चैत्र शुद्ध एकादसीला झाला.त्यांच्या वडिलाचे नाव हनवतराव कुशाबा शिन्दे आणि आईचे नांव चिमाबाई. वापटी गावातील हे एक छोटे आणि कष्टाळू शेतकरी कुटुंब. त्यांची आठ-दहा एकर शेती. दिवसरात्र शेतीवर काबाडकष्ट करून कशीबशी उपजिविका भागविणारे हे दांपत्य. निरक्षर पण सश्रद्ध. पंढरपूरचा विठोबा यांचे दैवत. साहजिकच आषाढीकार्तिकी एकादसीला पंढरीची वारी करण्याची घरात प्रथा. दैनंदिन जीवनात पूजाअर्चा कथाकीर्तन यांना विशेष महत्व. दोघेही श्रद्धावान, कष्टाळू तितकेच निरिच्छ आणि वैराग्यवृत्तीचे. कोणत्याही गोष्टीची विशेष हाव न बाळगणारे. पांडुरंगाने दिले तेवढ्यावर समाधान मानून जीवन जगणारे. कष्टाची भाकर खाऊन तृप्तीचा ढेकर देणारे. हनवतराव-चिमाबाईना एकूण चार मुले झाली. भीमराव, राधाबाई, बहिर्जी आणि रामराव. सर्वच मुलावर घरच्या धार्मिक आणि सश्रद्ध वातावरणाचा सुरवातीपासूनच सखोल परिणाम झाला.

अशा या सामान्य, गरीब पण भावुक कुटुंबात बहिर्जी लहानाचा मोठा होऊ लागला. गावात शाळा नव्हतीच. तेव्हा शिक्षणाचा प्रश्नच निर्माण झाला नाही. दहा-बारा वर्षाचे वय झाले तेव्हापासूनच डोक्यावर फडक्यात गुंडाळलेली भाकरी आणि हातात काठी घेऊन घरची गुरे राखण्याचे काम मागे लागले. दोन बैल, एखादी म्हैस, एखादी गाय, एकदोन वासरं ही घरची पशुसंपत्ती. सकाळीच उठावे- शेण गोळा करावे. तोंडावर पाणी मारून भाकर तुकडा खावा. गायी म्हसीचे धारोष्ण दूध काढून प्यावे. गुरं सोडावी आणि दुपारची भाकरी फडक्यात बांधून घेऊन त्यांच्यामागे काठी आपटीत निघावे. कधी माळावर तर

कधी माळपायथ्याशी गुरं चारायला सोडावी. आपण त्यांच्या मागेमागे राहावे.सूर्य बरोबर डोक्यावर आला म्हणजे एखादा ओहळओढा गाठावा. डोहाची जागा निवडावी. अंगावरील कपडे काढून त्यात धाडधाड उड्या माराव्या. मनसोक्त डुंबावे. दंगामस्ती करावी. पुन्हा जवळचा भाकरतुकडा खावा आगि दुपारच्या निवान्त वेळी गुरं झाडाच्या गार सावलीला जाऊन बसली म्हणजे सवंगड्यांना जमा करुन विटीदांडू, हुतूतू, आट्यापाट्या, कुस्त्यासारखे खेळ मांडावे. देहभान हरपून खेळावे. उन्हं उतरणीला लागली म्हणजे परत निघावे. कधी शेतात तर कधी घरी येऊन गुरं बांधावी. त्यांना चारा घालावा. थोड्या वेळाने दूध काढून संध्याकाळची भाकरी खावी आणि रात्रीच्या वेळी थोडावेळ कधी चावडीवर तर कधी मारोतीच्या पारावर गावातील इतर मुलाबरोबर जाऊन बसावे. मोठ्या माणसाच्या कळणाऱ्या न कळणाऱ्या गप्पा टप्पा ऐकाव्या. डोळे पेंगुळले म्हणजे घरी परत येऊन खुशाल झोपावे हा नित्यक्रम. वयाची सहा-सात वर्षे अशी गेली. रानचा मोकळा वारा लागून आणि घरचे भरपूर दुध दुभते खाऊन शरीर चांगलेच भरले. अंगात रग आली. पोहणे, कुस्त्या खेळणे  यामुळे वाढते शरीर चांगलेच पिळदार आणि मजबूत बनले.

वय वाढू लागले. आई वडिलांना वाटले आता आपला बहिर्जी मोठा झाला. थोरल्या भावाबरोबर शेतीचे काम करायला लागला. त्याला समज आली. आता त्याचे लग्न करावे. पोरीची शोधाशोध सुरु झाली पण लग्नाचा योग लवकर जुळून आला नाही. त्या काळच्या मानाने थोडा उशीरच झाला. मनात असूनही दुबळ्या आर्थिक परिस्थितीने पूर्णपणे साथ दिली नाही. शेवटी एकदाचा योग जुळून आला. वयाच्या अठरा एकोणिसाव्या वर्षी बहिर्जीचे लग्न ठरले. आसमन्तातील सगळ्या सोयऱ्याधायऱ्यांना आणि इष्टमित्रांना घेऊन चांगल्या पाच पंचवीस गाड्या दामटीत मोठी वरात जवळच्याच कोंढूर गावी गेली. कोंढूरचे  व्यंकटराव पतंगे यांची मुलगी गंगाबाई हिच्या बरोबर बहिर्जीचे लग्न लागले. गंगाबाईचे वय त्यावेळी १०-१२ वर्षाचे होते. ही एवढीशी, चिमुरडी, भोळी आणि निष्पाप पोर पत्नी म्हणून बहिर्जीच्या जीवनात आली. बहिर्जीच्या जीवनाचा एक नवा कालखंड सुरु झाला.

बहिर्जी आता हळू हळू शेतीची सर्वच कामे करू लागला. नांगरणे, वखरणे, पेरणे, कोळपणे वगैरे गोष्टी त्याला नीट जमू लागल्या. मोठ्या भावाच्या बरोबरीने आणि वडिलाच्या मार्गदर्शनाखाली बहिर्जी शेतात खपू लागला. कष्ट करू लागला. कष्टाची शेती करण्यात त्याला एक वेगळाच आनंद मिळू लागला. समाधान लाभू

लागले. शेतीतून फावल्या वेळात तो घरची गाडी जोडून भाडेतोडे करू लागला. गावच्या एखाद्या गरजू शेतकऱ्याचा कापूस, ज्वारी वगैरे माल गाडीत भरून नांदेड, हिंगोली, वसमत इत्यादी जवळपासच्या बाजारपेठांना भाड्याने घेऊन जाऊ लागला. कापसाचा भोत कितीही वजनदा : असो बहिर्जी एकटा उचलून गाडीत टाकीत असे. ज्वारीने टच्च भरलेले पोते अलगद पाठीवर उचलून फेकीत असे. अंग मेहनतीच्या कामात बहिर्जी आपल्या इतर दोन भावापेक्षा नेहमीच अग्रेसर आणि वरचढ असे. या कामाच्या निमित्ताने जवळपासच्या कांही शहरांचा परिचय घडून आला. शहरातील कांहीसे वेगळे, अपरिचित जीवन त्याला पहावयास मिळाले. याच काळात दोनचार वेळा पंढरीची वारीही घडली. एकदा तर घरची बैलगाडी जोडून बहिर्जी सहकुटूंब सहपरिवार पंढरीची वारी करुन आला. विठोबाच्या दर्शनाने जीवन कृतार्थ झाल्यासारखे वाटले.

याच काळात गावातील इतर सामाजिक आणि सांस्कृतिक खेडवळ जीवनाचाही बहिर्जी एक अविभाज्य भाग होता. गावातील तरूण मुले जमा करून व्यायाम करणे, खेडोपाडी जत्रेत जाऊन काळ्या मातीत कुस्त्या खेळणे, या शिवाय गावच्या भजनी मंडळात सामील होऊन भजन करीत रात्ररात्र जागविणे, पोथीपुराणाला उपस्थित राहून ते लक्षपूर्वक आणि श्रद्धापूर्वक ऐकणे इत्यादी बहिर्जीचे खास आवडीचे छंद होते. औंढ्याचा नागनाथ, पोतऱ्याचा महादेव, पांगऱ्याचा रोकडेश्वर, आंब्याची आई तसेच आमनाथ ही पंचक्रोशीतील गाजलेली दैवते. समवयस्क सवंगड्यांना बरोबर घेऊन बहिर्जी तेथील जत्रांना हमखास हजेरी लावायचा. कुस्त्यांचे फड गाजवून मोठे इनाम हस्तगत करायचा. भजन, किर्तन, प्रवचन, सप्ताह तर नेहमीच चाललेले असायचे. चापनाथचा बहिरोबा बहिर्जीचे कुलदैवत होते. तेथे त्याचे नेहमीच जाणे येणे होते.

एकूण त्या काळातील खेडवळ सामाजिक जीवनातील कोणत्याही क्षेत्रात बहिर्जी मागे नव्हता. त्याची दृष्टी विशाल होती. केवळ स्वतःच्याच मर्यादित संसारिक आणि कौटुंबिक जीवनात स्वतःला संपूर्णपणे कोंडून घेऊन त्यातच समाधान मानणाऱ्यापैकी बहिर्जी खासच नव्हता. अगदी बालवयापासूनच समुदायात राहणे, गावच्या सामाजिक आणि सांस्कृतिक महत्वाच्या कार्यात पुढे होऊन हिरिरीने भाग घेणे, गावकऱ्यांच्या सुखदुःखात मनःपूर्वक सहभागी होणे इत्यादी गोष्टी बहिर्जी स्वाभाविकपणे करीत असे. त्याची ही विशाल सामाजिक जाण उत्तरोत्तर वाढतच गेली आणि तो गावातील एक मनमिळावू, प्रेमळ, श्रद्धावान तसेच धडाडीचा आणि कर्तृत्ववान तरूण बनला.

## २

# हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामाची पार्श्वभूमी

एकोणीसशे सत्तेचाळीसचा धामधुमीचा काळ. भारताचे स्वातंत्र्य दृष्टिपथात आले होते. इंग्रजी साम्राज्याला ओहोटी लागली होती. त्यांनी भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या नेत्याबरोबर भारतीय स्वातंत्र्या बाबत वाटाघाटी सुरु केल्या होत्या. दीडशे वर्षाच्या दारुण गुलामगिरीच्या शृंखला आता लवकरच तटातट तुटून पडणार होत्या विशाल भारतीय जनता अमाप,उदंड आनंदाचा तो सोनियाचा स्वातंत्र्यदिन पाहण्यासाठी आंता कमालीची उत्सूक, आतूर झाली होती. स्वातंत्र्यचळवळीचा जोर आणि जोष मात्र अजूनही कायम होता. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे त्याचबरोबर आता जातीय दंगलींनी भयंकर रौद्र स्वरुप धारण केले होते. फाळणीचे महाभयानक भूत देशाच्या मानगुटीवर बसले होते. इंग्रजी साम्राज्यांतर्गत असलेल्या संस्थानांची डोकेदुखी निर्माण झाली होती. भारतीय स्वातंत्र्याच्या प्रभातकाली अशी ही संकटाची अभ्रें सगळीकडून दाटून आली होती.

विशाल भारताच्या ऐन मध्यभागी वसलेले हैदराबाद संस्थान हे असेच एक अवघड दुखणे होते. येथील एकूण राजकारण आणि सामाजिक परिस्थिती इतर प्रांतापेक्षा सर्वस्वी वेगळी आणि म्हणूनच अधिक गंभीर व गुंतागुंतीची होती.

हैदराबाद संस्थानात त्यावेळी आपल्या मराठवाड्याचे पाच (औरंगाबाद, परभणी, नांदेड, उस्मानाबाद आणि बीड. आता एकूण सात जिल्हे झाले असून नवे जिल्हे लातूर व जालना हे आहेत. ) आंध्र प्रांतातील तेलंगणचे आठ आणि कर्नाटकचे तीन असे एकूण सोळा जिल्हे होते. इ.स. १७२४ ते १९४८ अशी

सलग सव्वा दोनशे वर्षापासून येथे आसफिया घराण्याची एकतंत्री राजसत्ता चालत आली होती. शेवटचा सातवा निझाम अलाहजरत मीर उस्मान अलीखान इ.स. १९११ साली गादीवर आला होता. त्याच्या लहरी, हुकूमशाही आणि जात्यंध सत्तेखाली येथील सर्वसामान्य जनता पिचत होती आणि पिसली जात होती. या दुर्दैवी जनतेच्या नशीबी दुहेरी गुलामगिरी आली होती. एक होती संपूर्ण देशांतर्गत असलेली परकीय गोऱ्या इंग्रजांची गुलामगिरी आणि दुसरी होती स्थानिक संस्थानांतर्गत मानगूट पकडून बसलेली स्वकीय पण जुलमी जात्यंध संस्थानिकाची हुकूमशाही गुलामगिरी. हा मुस्लिम संस्थानिक धार्मिक बाबतीत जसा कडवा दुराभिमानी होता तसाच वृत्तीने तो अत्यंत हट्टी, दुराग्रही, कपटकारस्थानी आणि महत्वाकांक्षी होता. राज्यातील प्रजेच्या स्वातंत्र्याबाबतच्या कमालीच्या उत्कट आशा आकांक्षा आणि काळाचे आवाहन लक्षात न घेता तो इंग्रज हिंदुस्थानातून निघून गेल्यानंतर हैदराबाद संस्थान स्वतःच्या हुकूमशाही अधिपत्याखाली स्वतंत्र, सार्वभौम ठेवण्याची दिवास्वप्ने पहात होता. कांही स्थानिक जात्यंध मुसलमान मंडळीची त्याला जोरदार साथ होती. इत्तेहादुल मुस्लिमीन ही संपूर्ण जातीयवादी संघटना आणि तिचा प्रमुख सूत्रधार कुप्रसिद्ध कासिम रझवी आता निझामाचा प्रमुख सल्लागार बनला होता. या कासिम रझवीने बहादूर यारजंगाने उभारलेल्या रझाकारी संघटनेला (अर्थ- स्वंयसेवक दल) हेतूपूरःसर शस्त्र सज्ज करण्याचा खटाटोप चालविला होता. त्या आधारे कांही जात्यंध मुस्लिम युवकांची दिशाभूल करीत त्यांना बहुसंख्य हिंदू प्रजे विरुद्ध भडकविण्याचा भयंकर आत्मघातकी उद्योग आरंभिला होता. हिंदू जनतेवर सर्वच क्षेत्रात निझामाच्या हुकूमशाही राजवटीत फार मोठे अत्याचार सुरु झाले होते.

अशा एकूण राजकीय आणि सामाजिक गुंतागुंतीच्या परिस्थितीत तत्कालीन कॉंग्रेस संघटनेला येथे स्वातंत्र्य चळवळीचे कार्य चालविणे किती अवघड आणि अशक्यप्राय होते याची कल्पनाच केलेली बरी. निझामाची या संघटनेवर सुरवातीपासूनच वक्रदृष्टी होती. आता रझाकारी संघटनेचे आणि कांही जातीयवादी मुस्लिमांचे कट्टर शत्रूत्वही निर्माण झाले होते. पण अशा आणीबाणीच्या आणि कसोटीच्या परिस्थितीतही ही संघटना येथे दबून राहिली नाही. खचून कोलमडली नाही. नेस्तनाबूत झाली नाही. पूज्य स्वामी रामानंद तीर्थ यांच्या जाणत्या, दूरदर्शी, कुशल आणि कणखर नेतृत्वाखाली कॉंग्रेस संघटना येथे सतत कार्यरत राहीली. आपले धर्मनिरपेक्षतेचे स्वरूप कटाक्षाने टिकवित पण अनिष्ट प्रवृत्ती

विरूद्ध तेवढ्याच निकराने आणि नेटाने संघर्ष करीत राहीली. कधी उघड उघड तर कधी नाव बदलून. हजारोच्या संख्येने निष्ठावान आणि ध्येयवादी तरुण कार्यकर्ते येथे निर्माण झाले. एकत्र येऊन कार्य करू लागले. खेडोपाडी फिरून जनजागृती करु लागले. पारतंत्र्याविरूद्ध आणि अन्याय अत्याचाराविरुद्ध सामान्य जनतेचा आवाज बुलंद करु लागले. त्यांच्यामधील पुरूषार्थ, पराक्रम जागवू लागले.

भारतीय स्वातंत्र्याची शुभ घटिका समीप आली आणि निझाम चेकाळला. विशाल, स्वतंत्र भारतीय संघराज्यात हैदराबाद संस्थानच्या विलिनीकरणाची आम जनतेची मागणी त्याने बेमूर्वतपणे धुडकावून लावली. सत्तेची सूत्रे कासिम रझवीसारख्या कट्टर जातीयवादी आणि अल्पबुद्धी माणसाच्या हाती आली. त्याच्या रझाकारी संघटनेने संबंध संस्थानभर नुसता उत्पात मांडला. कायदा कोलमडून पडला. जुलूम, जबरदस्ती आणि दहशतीचे वातावरण निर्माण झाले. जनतेच्या जीवनातील सुरक्षितता संपूर्णपणे नष्ट झाली. बहुजन समाजाचा अनन्वित छळ सुरु झाला. त्यांच्या वरील पाशवी अत्याचारांना ऊत आला. त्यांची फार मोठ्या प्रमाणात जीवित आणि वित्त हानी होऊ लागली. गुंडशक्ती आणि दंडशक्ती एकत्र येवून संयुक्तपणे जनतेवर अन्याय करु लागली. भीतीपोटी लोक मोठ्या प्रमाणात निर्वासित बनून संस्थानाबाहेर सुरक्षित स्थळी निघून जाऊ लागले. काँग्रेस कार्यकर्त्यासमोर स्वतःचे अस्तित्व टिकविण्याचा जीवनमरणाचा प्रश्न उभा ठाकला.

अशा या आणीबाणीच्या कठीण काळाच्या सुरुवातीलाच हैदराबाद येथे १६,१७,१८ जून १९४७ रोजी हैदराबाद स्टेट काँग्रेसचे पहिले अधिवेशन झाले. अनेक दिवसाच्या बंदीनंतर एकत्र येण्याचा आलेला हा सुयोग. त्यामुळे स्वातंत्र्योत्सूक जनतेने या अधिवेशनाला अमाप गर्दी केली. सरकारी अनुमानाप्रमाणे या अधिवेशनाला किमान एक लक्ष लोक उपस्थित होते. उदंड उत्साहात आणि धूमधडाक्यात पार पडलेल्या या ऐतिहासिक अधिवेशनाचे अध्यक्ष होते स्वामी रामानंद तीर्थ. त्यांच्या उर्जस्वल तेजस्वी भाषणाने लोकमानसात नवचैतन्य संचरले. अधिवेशनात जबाबदार लोकशाही राज्यपद्धतीची आणि स्वतंत्र होणाऱ्या विशाल भारतीय संघ राज्यात हैदराबाद संस्थानच्या विनाविलंब संपूर्ण विलिनीकरणाची जोरदार मागणी करण्यात आली. त्यासाठी जीवनमरणाचा निर्णायक लढा उभारण्याची भीष्मप्रतिज्ञा घेण्यात आली. सर्वसाधारणतः पोक्त मंडळींनी सभाबंदीचे हुकूम मोडून, सत्याग्रह करून, कायदेभंग

आणि असहकाराचे आंदोलन चालवून स्वतःला अटक करून घ्यावी आणि निझामी शासनाचे तुरूंग भरावेत आणि उसळत्या गरम रक्ताच्या तरुण कार्यकर्त्यांनी भूमिगत होऊन सशस्त्र, क्रांती कारक, संघर्षमय लढा उभारावा अशी एकूण आंदोलनाची कार्यविभागणी करण्यात आली. भावी परिस्थितीच्या महाभयंकर झंझावाताची पूर्ण कल्पना लक्षात घेऊनच हे सर्व निर्णय विचारपूर्वक घेण्यात आले.

- अधिवेशनानंतर जुलमी निझामी सत्तेचा वरवंटा वेगाने फिरू लागला. अनेक प्रमुख काँग्रेस कार्यकर्त्यांची धरपकड झाली. त्यांना तुरुंगात डांबण्यात आले. लोकामध्ये दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न सुरु झाला. पण काँग्रेसचे छोटे मोठे कार्यकर्ते मुळीच डगमगले नाहीत. निर्धारपूर्वक आणि निर्भिडपणे त्यांनी आपापल्या भागात जाऊन लढ्याचे रणसिंग फुंकले..... प्रचंड लढा सुरु झाला......

काँग्रेस संघटनेने लढ्याचा सविस्तर कार्यक्रम ठरवून दिला होता. त्यानूसार सात ऑगष्टला भारतीय संघराज्यात सामील होण्याची मागणी करीत सत्याग्रह करणे, पंधरा ऑगष्टला घरोघर तिरंगी ध्वज फडकावून स्वातंत्र्यदिन साजरा करणे शिवाय शाळा,कॉलेज, सरकारी कचेऱ्या संपूर्णपणे ओस पाडून सरकारशी असहकार करणे, शेतसारा, लेव्ही न देणे, जंगल सत्याग्रह करणे, करोडगिरी नाकी उध्वस्त करणे, पोलीस ठाण्यावर हल्ले करणे, राज्यकारभार बंद पाडून खेडी स्वतंत्र करणे व सशस्त्रपणे अन्याय अत्याचाराचा कडवा प्रतिकार करणे असे विविध स्वरूपाचे कार्यक्रम होते. सत्तेचाळीसच्या ऑगष्टमध्ये या सर्व कृती कार्यक्रमांची संस्थानभर धमाल उडाली.

पंधरा ऑगष्ट एकोणीसशे सत्तेचाळीस रोजी भारत इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त झाला. स्वातंत्र्याचा सुर्योदय झाला. विशाल भारतीय जनता स्वातंत्र्याच्या उदंड आनंदोत्सवात दंग झाली. रममान झाली. त्याचवेळी भारतांतर्गत हैदराबाद संस्थानातील दुर्दैवी जनता मात्र स्वतःच्या स्वातंत्र्यासाठी आणि अस्तित्वासाठी हुकूमशाही जुलमी निझामी सत्तेविरुद्ध जीवनमरणाचा जालीम संघर्ष करीत होती. एक सर्वकष लढा लढत होती.

३

# वापटीचा जंगल सत्याग्रह आणि बहिर्जींचे आंदोलनात आगमन

परभणी जिल्ह्यातील वसमत तालुका लढ्याच्या या सर्वच कार्यक्रमात अग्रभागी होता. हैदराबादच्या काँग्रेस अधिवेशनानंतर लगेच ३० जून १९४७ रोजी परभणी येथे जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्त्यांची एक बैठक झाली. बैठकीत कामाची विभागणी करण्यात आली. सर्व प्रमुख नेत्यांच्या पकडीचे वॉरन्टस आता जारी झाले होते. वसमतचे एक तरुण आणि धडाडीचे कार्यकर्ते गंगाप्रसाद अग्रवाल परभणीच्या बैठकीनंतर पोलीसाच्या हातावर तूरी देऊन भुमिगत झाले आणि वसमत तालुक्याच्या कुरुंदा परिसरात जाऊन पोंहचले. तेथे ग्रामीण युवा कार्यकर्त्यांचा चांगला गट होता. कुरूंद्याचे बाबूराव कणेवार, बन्शीलाल शर्मा, बा.भ.जोशी, शामराव इजारदार, गिरगावचे गंगाराम कऱ्हाळे त्यांना येऊन मिळाले आणि वसमत तालुक्याच्या ग्रामीण भागात आंदोलनाचे तूफान वेग घेऊ लागले. जवळपासच्या पंचवीस तीस खेड्यात फिरून त्यांनी जनजागृती केली आणि लोकांना आंदोलनास प्रवृत्त केले. अधूनमधून वसमत शहराशीही ते संपर्क ठेवून होते. सात ऑगष्टच्या सत्याग्रहासाठी सिद्ध झालेल्या लोकांच्या लांबचलांब याद्या आता गावोगाव तयार झाल्या होत्या. लोक प्रतिकारास सज्ज होऊ लागले होते. निझामी पोलीसदल मात्र बिथरुन गेले होते. सत्याग्रह होण्याच्या आधीच त्यांनी धरपकड सुरु केली. वसमतचे विश्वनाथराव कात्नेश्वरकर, हनमंतराव मोहरीर, अंबादासराव कुरूंदकर, दत्तोपंत आगलावे स्थानबद्ध झाले. गंगाप्रसाद अग्रवाल

यांना जेरबंद करण्यासाठी निझामी सत्तेने जंगजंग पछाडले पण ते शेवटपर्यंत सापडले नाहीत.

सात ऑगष्टला वसमत आणि कुरूंदा येथे मोठे सत्याग्रह झाले. किसान आणि विणकर कामगार तरुण हातात हात घालून घराबाहेर पडले आणि त्यांनी स्वतंत्र होऊ घातलेल्या भारतीय संघराज्यात हैदराबाद संस्थान बिनशर्त सामील करून घेण्यासाठी आवाज उठविला. शेकडो लोक सत्याग्रह करून तुरुंगात गेले. पंधरा ऑगष्टला भारताचा स्वातंत्र्यदिन साजरा करण्यासाठी घरोघर तिरंगा फडकावण्याचे आणि झेंडावंदनाचे प्रयत्न झाले. वसमतचे दारेवार बंधू यांचे घरावरील 'झेंडा प्रकरण' चांगलेच चिघळले. घरावर चाल करून आलेल्या जमावापासून त्यांनी आणि त्यांच्या शूर साथीदारांनी प्राणपणाने झेंड्याचे रक्षण केले. शेवटी पोलीसांनी दारेवार यांनाच अटक करून झेंडा जप्त करण्याची एकतर्फी आणि हडेलहप्पी कारवायी केली.

आता जंगलतोड सत्याग्रहाचे आदेश आले होते. त्यासाठी गंगाप्रसाद अग्रवाल वापटीकडे वळले वापटी आणि वापटीचे वाघ दिलाचे बापूराव शिन्दे साथीला धावून आले. वापटी गावाजवळच्या त्यांच्या मळ्यात वसमत तालुका भूमिगत आंदोलनाचे गुप्त केंद्र थाटण्यात आले. परंतु पुढे ही जागा वापटी ते बोलडा स्टेशन रस्त्यावर असल्याने असुरक्षित वाटू लागली. याचवेळी जवळच्याच शिन्दे पांगरा गावचे रामराव जोशी येऊन भेटले. पांगऱ्याच्या पार पलीकडे डोंगरदरीत लपलेला त्यांचा मळा त्यांनी मुक्कामासाठी दाखविला. पुढे याच डोंगरदरीतील मळयात संपूर्ण सुरक्षित ठिकाणी भूमिगत आंदोलनाचे गुप्त केंद्र कायम झाले. गंगाप्रसाद अग्रवाल यांचेबरोबर बा.भ.जोशी, शामराव इजारदार, नागोराव शिन्दे केंद्राचे काम पाहू लागले. प्रसादजीचे एक शाळा सोबती बापूराव भोसले नांदापूर स्टेशनवर 'मास्तरकी' करीत इकडून तिकडून येणारा गुप्त पत्रव्यवहार काळजीपूर्वक पोंहचता करू लागले. पुढे चारठाण्याचे शाहीर प्रभाकर वाईकर संपतराव पाटील सातारकर असे नांव धारण करून प्रसादजींना येऊन मिळाले. प्रसादजी शब्दांची जुळवाजुळव करीत प्रचारकी थाटाची गाणी स्वतः तयार करू लागले. शाहीर ती गाणी आपल्या पहाडी आवाजात जनतेसमोर सादर करीत अवघा पहाडी मुलुख दणाणून सोडू लागले.

शेतकरी दादा लढा सुरु झाला S S S

आता सुरु झाला
चला चला शिंदबन तोडायला.....

केल्या किती जरी गमजा निझामा
तुझ्या राज्याची धडगत आता नाय र S S
नाय र S S नाय र S S

वापटी आणि वापटीचा परिसर या मोहिमेने खडबडून जागा झाला. वापटी, कुपटी, सिंदगी, पांगरा, बोलडा, सिरळी, नांदापूर ते थेट इकडे कुरूंदा गिरगाव जवळाबाजार पर्यंत खेड्यापाड्यातील शेकडो शेतकरी तरुण या आंदोलनात ओढले गेले. जीवाची बाजी लावून जिद्दीने उभे ठाकले. कांही तरी अचाट आणि अफाट करुन दाखविण्यासाठी त्यांचे हात शिवशिव् लागले.

वापटी गाव तर या आंदोलनाने नुसता भारला गेला होता. गावातील झाडून सारी तरुण मंडळी जीवावर उदार होऊन आणि कंबर कसून घराबाहेर पडली होती. कुऱ्हाडी, गोफनी, लाठ्या-काठ्या इत्यादी गावठी शस्त्रांनी सुसज्ज झालेली ही माणसे वादळासारखी बेभान होऊन चौफेर फिरत होती. प्रत्यक्ष कळीकाळाशीही झुंज घेण्याची वेडी जिद्द त्यांच्या मनात निर्माण झाली होती. निझाम आणि निझामी पोलीस यांची त्यांना मुळीच भिती वाटत नव्हती. रझाकारांनी तर त्यांची खरोखरच भयंकर धसकी घेतली होती. वापटीच्या परिसरात पाऊल ठेवण्यास तेव्हा रझाकार आणि पोलीस धजत नव्हते.

स्टेट काँग्रेसने तेव्हा जंगलतोड सत्याग्रहाचा आदेश दिला होता. राज्यात भरपूर प्रमाणात असेलली शिंदीची झाडे तोडून हा सत्याग्रह अंमलात आणावयाचा होता. शिंदीचीच झाडे तोडण्याचा निर्णय विचारपूर्वक घेण्यात आला होता. तेव्हाच्या निझामी सत्तेला या शिंदीच्या बनाचे भरमसाठ उत्पन्न होते. एकूण तीस कोटी महसूल उत्पन्नापैकी बारा कोटीचे उत्पन्न देणारे हे एक हुकमी साधन होते. त्यामुळे निझामाच्या राजवटीत तेव्हा शिंदीचे झाड तोडण्यास कायद्याने बंदी होती. शेतकऱ्याला मात्र स्वतःच्या मालकीच्या शेतातील शिंदीची झाडेही तोडता येत नव्हती. त्याच्या मालकीची लागवडीयोग्य जमीन शिंदीच्या झाडांनी अडवली जावून तिचे उत्पन्न मात्र आयते निझामाच्या घशात जात होते. गरीब बिचाऱ्या शेतकऱ्याच्या दृष्टीने ही परिस्थिती असह्य आणि अन्यायकारक होती. म्हणूनच शिंदीची झाडे तोडून निझामाची तिजोरी फोडण्याचे आणि शेतकऱ्यांना संघटित

करण्याचे कॉंग्रेसने ठरविले होते.

वापटीच्या अवतीभवती दाट शिंदबन होते तेव्हा तेथूनच जंगलतोड सत्याग्रहाची सुरवात करावी असा निर्णय झाला. त्याप्रमाणे गावोगाव संदेश पोंहचविण्यात आले.

१ सप्टेम्बर १९४७ ची सकाळ. हाती तळपत्या कुऱ्हाडी घेऊन हजारो शेतकरी तरुण वापटी गावात जमा झाले. 'वन्दे—मातरम ' 'स्टेट कॉंग्रेस—झिंदाबाद ' 'स्वामी रामानंद तीर्थ की -जय' इत्यादी गगनभेदी घोषणा देत मिरवणूक निघाली. गावभर फिरुन गावालगतच्या नदी काठावरील खंडेराव पोलीस पाटलाच्या शेतावर आली. सत्याग्रह सुरु झाला. एकाचवेळी हजारो हात सपासप कुऱ्हाडीचे घावावर घाव घालू लागले. ताठ उभे असलेले शिंदीचे जंगल पाहता पाहता भुईसपाट होऊ लागले.

दाण्.. दाण्..दाण् ...

बेधूंद होऊन बेफाम कुऱ्हाड चालविणारा हा एक भन्नाट तरुण. मजबूत हाडापेराचा आणि तरणाबांड, गुडघ्यापर्यंत वर घेऊन कमरेला गच्चं खोचलेले धोतर. अंगात पांढरा सदरा अन डोईवर केशरी मंदील. ऐन पंचवीसीतल्या या जवानमर्द शेतकरी तरुणाचे नांव आहे. बहिर्जी ....बहिर्जी शिन्दे वापटीकर.......

बहिर्जीनि सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले....

जंगलतोड सत्याग्रहाच्या निमित्ताने बहिर्जी स्वातंत्र्य आंदोलनात आला आणि एक भरवशाचा, विश्वासू व आघाडीचा स्वातंत्र्यसैनिक बनला. या आंदोलनाने त्याच्या अंगात जणू वीज संचरली. त्याच्या कर्तृत्वाला अफाट आकाश गवसले.

परभणी जिल्ह्यातील पहिल्या जंगलतोड सत्याग्रहाची चकमक अशारितीने वापटीच्या माळरानात झडली. वात पेटली. वातावरणात मोठ्ठा जाळ झाला. आगडोंब उसळला. सर्वत्र पसरला. जिल्ह्यातील सर्व भागात आणि विशेषतः कळमनुरी तालुक्यात जंगलतोड सत्याग्रहाचा पुढे धुमधडाका सुरु राहिला.

भूमिगत आंदोलनाची तीव्रता वाढली होती. त्याचबरोबर सरकारी सत्तेची दडपशाही देखील वाढली होती. आता आंत राहून हे आंदोलन असेच पुढे रेटणे जोखमीचे आणि अतिशय अवघड बनले होते. पण त्याच बरोबर जनतेच्या जागृत

झालेल्या शक्तीला संपूर्णपणे वाऱ्यावर सोडून देण्यातही मुळीच शहाणपणा नव्हता. जनतेच्या या शक्तीला आता व्यवस्थित आणि अधिक परिणामकारक स्वरूप तसेच वळण देण्याची नितांत गरज निर्माण झाली होती. काँग्रेस संघटनेने ही परिस्थिती ओळखली आणि आपल्या कार्यकर्त्यांना संस्थानाबाहेर पडून सीमेलगत जिल्हावार सशस्त्र आंदोलनाची केंद्रे स्थापन करण्याचा नवा आदेश दिला. त्याप्रमाणे परभणी जिल्ह्याचे मुख्यकेंद्र संस्थानाबाहेर पण लगतच्याच आकोला जिल्ह्यातील वाशिमला कायम करण्यात आले. सेलूचे विनायकराव चारठाणकर केंद्र प्रमुख आणि वसमतचे गंगाप्रसाद अग्रवाल उपकेंद्रप्रमुख बनले. प्रत्यक्ष कार्य करण्याच्या दृष्टीने आक्टोबर १९४७ मध्ये सरहद्दीवर सूरवातीला लगतच्या तालुक्याची तीन वेगवेगळी सशस्त्र कारवायी केंद्रे स्थापन झाली ती पुढीलप्रमाणे जिंतूर तालुका - लोणी केंद्र, हिंगोली तालुका - व्याड केंद्र, कळमनुरी तालुका - शेंबाळ पिंपरी केंद्र.

वसमत तालुका सरहद्दीपासून दूर आतल्या भागात. पण गंगाप्रसाद अग्रवाल यांचे नेतृत्वाखाली या तालुक्याचे शेसव्वाशे स्वातंत्र्यसैनिक वाशिम केंद्रावर जमा झाले होते. यात वापटीचा वाटा मोठा होता. या सर्व सैनिकांना कुठे पाठवावे हा प्रश्न निर्माण झाला आणि त्यातूनच पुढे नोव्हेम्बर १९४७ मध्ये वसमत तालुक्याचे एक स्वतंत्र केंद्र सरहद्दीवरील दगडधानोरा या खेडेगावी कायम करण्यात आले.

प्रत्येक केंद्रावर त्या त्या तालुक्यातील शंभर-सव्वाशे स्वातंत्र्यसैनिकांची संख्या होती. त्यांना जमली तेवढी तुटपुंजी शस्त्रे पुरविण्यात आली होती. प्रत्येक केंद्राने आपापल्या तालुक्यात सशस्त्र हल्ले करून जुलमी निझामी राजवटीचा पाया खिळखिळा करावा आणि तिला जेरीस आणावे असे ठरले होते. एक शेवटचा, सर्वश्रेष्ठ, सशस्त्र लढा देण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

बहिर्जी शिन्दे वसमत तालुक्यातील वापटीचा राहणारा म्हणून तो वसमत तालुक्याच्या दगडधानोरा केंद्रावर एक बिनीचा शिपाईगडी म्हणून रूजू झाला.

## ४

# सशस्त्र आंदोलनाची सुरुवात वापटी पोलीस चौकीवर हल्ला

दगडधानोरा केंद्रावर वसमत आणि वसमत तालुक्यातील वापटी, कुपटी, पांगरा, सिंदगी, जवळाबाजार, कुरूंदा, गिरगांव इत्यादी खेड्यापाड्यातील शेसव्वाशे तरुण स्वातंत्र्यसैनिक एकत्र आले होते. त्यापैकी रुढार्थाने शिकलेले-सुशिक्षित म्हणता येतील असे फारच थोडे होते. बहुसंख्य तरुण निरक्षर कांही केवळ अक्षर ओळख असलेले अर्धशिक्षित असेच साधेभोळे शेतकरी कामकरी तरुण होते. तत्कालीन एकूण राजकीय आणि सामाजिक परिस्थितीची जाण मात्र त्यांना पूर्णपणे आलेली होती. अन्याय आणि अत्याचारा विरुद्ध त्यांच्या मनात भयंकर स्वरुपाची चीड निर्माण झाली होती. हुकूमशाही निझामी सत्तेविरुद्ध आणि जुलमी रझाकाराविरुद्ध त्यांचे तरुण रक्त पेटून उठले होते. प्रत्यक्ष कळीकाळाशीही झुंज घेण्याची जबरदस्त जिद्द त्यांच्या रोमारोमात निर्माण झाली होती. म्हणूनच हाती असलेल्या तुटपुंज्या, मोडक्यातोडक्या शस्त्रास्त्रासह आणि लढाईच्या अगदीच जुजबी, सर्वसाधारण ऐकीव ज्ञानासह बलाढ्य, सर्वसामर्थ्यवान निझामी सत्तेला टक्कर देण्यास ते तटीने ताठ होऊन उभे ठाकले होते.

बहिर्जी शिन्दे असाच एक दुर्दम्य स्वातंत्र्याकांक्षेने भारलेलानिरक्षर शेतकरी तरुण .अत्यंत अबोल स्वभावाचा पण तेवढाच मन मिळावू,प्रेमळ,आज्ञाधारक आणि शिस्तप्रिय. ठरलेल्या गोष्टीबाबतचे वरिष्ठांचे आदेश निष्ठा व निर्धारपूर्वक

तंतोतंत पाळणारा, जीव तोडून काम करणारा, वितंडवाद, भांडण तंट्यात फालतू वेळ न घालवणारा, सर्व साथीदाराशी मिळून मिसळून गोडीगुलाबीने वागणारा, त्यांच्या कडून चांगल्या गोष्टी शिकण्याची अपेक्षा ठेवणारा आणि त्यांनाही आपल्यांकडून शक्य ते सर्व सहाय्य करण्यास सदैव तत्पर तयार असणारा असा बहिर्जी होता. आपण निरक्षर आहोत याची त्याच्या मनात निरतिशय खंत होती. म्हणून इतर शिक्षित साथीदाराकडून थोडीफार अक्षर ओळख त्याने याच काळात रिकाम्या वेळात प्रयत्नपूर्वक करून घेतली होती. त्याबरोबरच पाण्यात पोहता न येणाऱ्या आपल्या अनेक सवंगड्यांना त्याने याचकाळात आवर्जून पोहणे शिकविले होते. कारण तो एक पट्टीचा पोहणारा होता.

बहिर्जीचे वय त्यावेळी अवघे सव्वीस-सत्तावीस वर्षाचे होते. त्याचे शरीर चांगले दणकट होते. त्याच्या शौर्याबद्दल आणि धाडसाबद्दल सर्वांनाच खात्री होती. तो एक उत्कृष्ट नेमबाज होता. उत्तम सैनिकाला आवश्यक असणारे असे अनेक सद्गुण त्यांच्या अंगी होते. म्हणूनच कांही निवडक स्वातंत्र्यसैनिकाना एक महिन्याचे कामचलावू लष्करी शिक्षण देण्याचे ठरले तेव्हा साहजिकच वसमत तालुक्यातून बहिर्जीचे नांव सर्व प्रथम पुढे आले. जबलपूर येथे बहिर्जीला एक महिन्याच्या लष्करी शिक्षणासाठी पाठविण्यात आले. भारतीय लष्करी अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली जबलपूरला एक महिन्याचे लष्करी शिक्षण पूर्ण करून बहिर्जी परत आपल्या केंद्रावर येऊन रूजू झाला.

काँग्रेस संघटनेने मर्यादित स्वरुपात शस्त्रास्त्रांचा पूरवठा केला. सशस्त्र कारवायी करण्यासाठी कार्यक्रम ठरवून दिला. त्यानुसार सरहद्दीवरील निझामी करोडगिरीची नाकी उध्वस्त करणे, रझाकारी केंद्रावर हल्ले करणे, आतल्या भागात शिरून जनतेची संरक्षणदले कायम करणे, निझामी पोलीस ठाण्यावर हल्ले करून ती उडवून लावणे व सीमेलगतचा टापू क्रमाने काबीज आणि स्वतंत्र करीत आत घुसणे असे कार्यक्रम ठरले होते.

वसमत तालुक्याच्या स्वातंत्र्य सैनिकांनी आपली पहिली महत्वाची सशस्त्र कारवायी वापटी येथील पोलीस चौकीवर जोरदार हल्ला चढवून केली. वापटी म्हणजे जणू वसमत तालुका स्वातंत्र्य आंदोलनाचे धगधगते यज्ञकुंड. सैनिकांची मुख्य कर्मभूमी. येथेच त्यांनी जंगलतोड सत्याग्रहाची धमाल उडवून दिली होती. निझामी सत्तेला आव्हान दिले होते. पुढे स्वातंत्र्यसैनिक वापटीचा परिसर सोडून

सरहद्दीबाहेर निघून गेले आणि निझामी सत्तेने वापटीला एक नवीन पोलीस चौकी आणून बसविली. यामागे अर्थातच या भागातील भूमिगत चळवळीचे मूळ खच्ची करण्याचा, येथील लोकांच्या मनात धाक निर्माण करण्याचा प्रयत्न होता. या चौकीवर तीनचार सशस्त्र पोलीस आण ा ठेवले होते. हे पोलीस वापटी आणि आजुबाजुच्या खेड्यापाड्य तील सर्वसामान्य गरीब शेतकरी जनतेवर जुलुम जबरदस्ती करीत होते. स्वातंत्र्यसैनिकांच्या नातेवाईकांवर तर त्यांचा विशेष रोख होता. त्यांना नित्य अत्यंत गलिच्छ शिवीगाळ, धाकदपटशा, मारझोड करण्यात त्यांना कृतार्थता, धन्यता वाटे. कायदा आणि सुव्यवस्थेच्या नावाखाली आलेले जनतेचे हे रखवालदार पोलीस शिपायी निरपराध जनतेलाच गुलामासारखे, गुरासारखे झोडपीत सुटले होते. लोक त्रस्त झाले होते. पोलीसांनी चालविलेल्या या अनन्वित अत्याचाराच्या बातम्या स्वातंत्र्यसैनिकांच्या कानी येत होत्या. या विपरित बातम्या ऐकूण त्यांच्या तळपायाची आग मस्तकाला जाऊन भिडे. त्यांचे रक्त सळसळून उठे. या बेताल, बेमूर्वतखोर, शेंदाड शिपायांना चांगला धडा शिकविण्याच्या उद्देशाने शेवटी वापटी पोलीस चौकीवर हल्ला करण्याचा धाडसी निर्णय घेण्यात आला.

जानेवारी १९४८ चा शेवटचा आठवडा. २७ तारखेला सरहद्दीवरील जगापूर जवळून २०-२२ स्वातंत्र्यसैनिकांनी पेनगंगा नदी ओलांडली आणि निझामी हद्दीत प्रवेश केला. वसमतचे नागोबा अलसटवार, नागोबा दारेवार, वापटीचे बहिर्जी शिन्दे, बापूराव शिन्दे, विठ्ठलराव, साहेबराव,भाऊराव, गंगाराम कोंडिबा शिन्दे, संभाजी कोल्हे, सिंदगीचे राजाराम मगर, जवळ्याचे अप्पामाळी इत्यादी महत्वाचे सैनिक या कारवायीमध्ये होते. एकुलती एक रायफल, दोनतीन रिव्हाल्व्हर, कांही छोटे हात बॉम्ब अशी मोजकीच शस्त्रास्त्रे त्यांच्या हातात होती. बहिर्जी शिन्दे मार्गदर्शक म्हणून सर्वात पुढे चालत होता. या भागातील सर्वच वाटा त्याच्या चांगल्या परिचयाच्या होत्या आणि विशेष म्हणजे आकाशातील चांदण्या पाहून त्या अनुरोधाने दिशा ठरविण्याचे एक वैशिष्ट्यपूर्ण ज्ञान केवळ बहिर्जीलाच अवगत होते. म्हणून तो नेहमीच पुढे असे. आडवाटेने डोंगरदऱ्यातून, काट्याकुट्यातून रात्रभर पायपीट करीत हे सर्व सैनिक वापटीपासून जवळच असलेल्या कोंढूर नदीजवळ आले. नदीच्या पात्रात थंडगार वाळुमध्ये थोडावेळ विश्रांती घेऊन सर्वांनीच आपला थकवा कांहीसा घालविण्याचा प्रयत्न केला. सतत तीसचाळीस मैलाच्या पायपीटीने सर्वजण विलक्षण बेजार झाले होते. कांहीच्या

मनात याचवेळी ही कारवायी आणखी एखादा दिवस पुढे लांबविण्याचाही विचार घोळत होता. पण आता थोडा देखील वेळ वाया घालवून चालण्यासारखे नव्हते. शत्रूला सुगावा लागला तर सर्वांचेच जीव धोक्यात आले असते. आता तातडीची आवश्यकता होती. म्हणून शेवटी सर्वजण निर्धारपूर्वक उठले. वापटीच्या रोखाने झपाझप पावले टाकीत मार्ग आक्रमू लागले.

२८ जानेवारी १९४८ ची सकाळ उजाडत होती. चार साडेचारची वेळ असावी. सर्वत्र भयाण शांतता होती. हवेत कमालीचा गारठा जाणवत होता. माळरान जागे झाले नव्हते. गाव अजून गाढ निद्रेत पहुडले होते.

पोलीसचौकी गावाच्या पार दक्षिण बाजूला होती. सैनिक उत्तरेकडून गावात शिरले. गावातून लपत छपत, अंधाराचा, घराच्या भिंतीचा आडोसा आसरा घेत, पावलाचा बिलकुल आवाज न होऊ देता, चोरपावलांनी ते सर्व पोलीस चौकीजवळ आले. चौकीच्या बाहेर मोकळ्या मैदानात शेकोटी पेटलेली होती. शेकोटी जवळ बंदूक शेजारी ठेवून पहारेकरी पोलीस इतर चार सहा माणसासह शेकत बसला होता. शेकोटीतील जाळाचा पिवळसर लाल प्रकाश त्याच्या चेहऱ्यावर पडला होता. त्या प्रकाशात तो पोलीस चांगला ओळखू येत होता. त्यांच्या गप्पा रंगात आल्या होत्या. इतक्यात रायफल हाती असलेले नागोबा अलसटवार एकदमच चवताळलेल्या चित्याप्रमाणे विजेच्या वेगाने रायफल रोखून पुढे धावले. शेकत बसलेला तो पोलीस धांदरून "कौन है" ओरडत दचकून शस्त्र सावरीत उठला. त्यानेही गडबडून शस्त्र रोखण्याचा प्रयत्न केला पण तो पर्यंत अलसटवारांनी अचूक मारलेली गोळी त्याचा शरीरातून आरपार निघून गेली होती. तो धाडकन त्या पेटत्या शेकोटीवर कोसळला होता. नागोबा दारेवार बहिर्जी शिंदे, बापूराव शिंदे अप्पा माळी हे इतरही सैनिक त्वरेने अलसटवाराच्या मागोमाग आपापली शस्त्रे घेऊन धावले होते. पालथ्या पडलेल्या पोलीसाबरोबर शेकोटी भोवती बसून गप्पा झोडणारे इतर लोक कमालीचे भेदरून गेले होते. हातापाया पडून गयावया करीत ते प्राणाची भीक मागत होते. त्या निशस्त्र लोकावर गोळ्या झाडण्यात पुरुषार्थ नव्हता. ठार झालेल्या पोलीस शिपायाची बंदूक प्रथम हस्तगत करण्यात आली आणि नंतर सर्वांनी एकवटून चौकीच्या इमारतीवर गोळीबार सुरु केला. चौकीच्या समोरचा बराचसा भाग उघडाच होता. त्यातून गोळ्या आत घुसत होत्या पण बाहेरची गडबड कानी पडताच जागे होऊन आणि गांगरून जाऊन चौकीमधील दोन तीन पोलीस शिपायी

आपली शस्त्रे घेऊन इमारतीच्या आढ्यावर आडोशाला जाऊन बसले होते. तेथून ते जमेल तितका प्रतिकार करण्याचा प्रयत्न करीत होते. स्वातंत्र्य सैनिकांनी थोडावेळ गोळीबार केला आणि नंतर त्यांचा पिच्छा सोडून दिला. कारण आता अधिकवेळ येथे घालविणे धोक्याचे होते. लवकरच उजाडणार होते. उजाडण्या अगोदर तातडी करून कुणाच्याही नजरेत न येता गाव सोडून माळरानात दूरदूर निघून जाणे आवश्यक होते. त्याप्रमाणे ठार मारलेल्या पोलीस शिपायाची बंदूक घेऊन सर्वजण निघाले. वेगाने घनदाट जंगलात अंतर्धान पावले. दिवसभर कुठेतरी दऱ्या-खोऱ्यात, झाडाझुडपात दडून राहीले. दाट अंधार झाल्यानंतर पुन्हा रात्रभर ३०-४० मैलाचा पल्ला मारून सरहद्दीबाहेर पडले. काम फत्ते करून सुखरूप सर्वजण केंद्रावर परत आले.

वसमत तालुक्याच्या स्वातंत्र्यसैनिकांनी हाती घेतलेली ही पहिलीच मोठी आणि महत्वाची कारवायी यशस्वी ठरली होती.सशस्त्र झटापटीचा एक रोमहर्षक, चित्तथरारक, स्फूर्तिप्रद अनुभव त्यांना आला होता. त्यांचा स्वतःच्या सामर्थ्यावरील विश्वास दुणावला होता. पराक्रम गाजविण्याची अधिकतर मोठी महत्वाकांक्षा त्यांच्या मनात निर्माण झाली होती. आता अधिक जबरदस्त आत्मविश्वासाने ते हें कार्य पुढे चालविणार होते. कांही तरी दिव्यभव्य करून दाखविणार होते पण नेमके याचवेळी ३० जानेवारीला सायंकाळी पाच वाजता दिल्लीच्या बिर्लाभवनात भारताच्या इतिहासातील एक काळीकुट्ट घटना घडली. भारतीय स्वातंत्र्याचे महान शिल्पकार राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची प्रार्थनेच्या जागी हत्या झाली. एका माथेफिरु माणसाने या थोर विभूतीवर गोळ्या चालविल्या. ही घटना एकूण भारतीय जनजीवनावर फार मोठा आघात करणारी होती. सर्वच स्वातंत्र्यसैनिकांच्या मनावर या भयंकर दारूण दुःखद घटनेने वज्राघात केला होता. त्यांच्यातील सारा उत्साह, त्यांचे सारे शौर्य मरगळून गेले होते. त्यांची विचारशक्ती सुन्न, कुंठित झाली होती. कांही काळ तरी ही सशस्त्र चळवळ या शोकाकुल घटनेमुळे थंड पडली होती. बेजान झाली होती.

काळ मोठा अजब जादुगार आहे. दुःखाच्या आणि संकटाच्या अविरत, अव्याहत वादळ वाऱ्यातून बाहेर पडण्यास आणि पुढची वाटचाल सुरु ठेवण्यास शेवटी तोच हात देतो. स्वातंत्र्योत्तर आलेल्या संकटपरंपरेने देश खचून गेला नाही. कोलमडून पडला नाही. नामशेष झाला नाही. अत्यंत प्रतिकुल परिस्थितीमधुनही तो शेवटी सावरला गेला. उभा राहीला. स्वातंत्र्यसैनिकांनाही

हाती घेतलेल्या आणि अजुन अपूऱ्या अवस्थेत असलेल्या आपल्या कठोर कर्तव्याची जाणीव झाली. पुन्हा ते नव्या जोमाने आणि जिद्दीने कामाला भिडले. मध्यंतरी कांही किरकोळ स्वरुपाची प्रगती झाली होती. सरहद्दीलगतच्या अनेक लहानलहान गावामधून रझाकारांना आणि निझामी सत्तेला हुसकून ला ून, पळवून लावून स्वातंत्र्य सैनिकांनी ती गावे मुक्त केली होती. तेथे जनतेची संरक्षक दले स्थापन करुन त्यांच्याकरवी आणि आपल्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्र कारभार सुरु केला होता. अशा तऱ्हेने सरहद्दीलगतचा बराच मोठा प्रदेश निझामी सत्तेच्या जुलमी जोखडातून मुक्त झाला होता.

५

# शिरडशहापूर पोलीस ठाणे उध्वस्त

वसमत तालुक्याच्या स्वातंत्र्य सैनिकांचे दुसरे 'लक्ष्य' होते- कुरूंदा पोलीस ठाणे. कुरूंद्याचा अमीन (फौजदार) मोठा जुलमी आणि जात्यंध होता. कॉंग्रेसी लोकावर तर त्याचा विशेष रोख आणि रोष होता त्यांना हर प्रकारे छळण्यात आणि मारझोड करण्यात त्या क्रुरकर्म्याला मोठी मौज आणि अभिमान वाटे. त्याचा काटा काढण्यास स्वातंत्र्यसैनिक उत्सुक होते. त्यादृष्टीने गुप्तहेर पाठवून चाचपणी करण्यात आली होती. 'रिपोर्ट ' तेवढे अनुकुल नव्हते. आणि मुख्य म्हणजे तो भेदरलेला पण धूर्त अमीन रात्रीचा फारसा गावातच थांबत नसे. त्यामुळे तो नक्की सापळ्यात सापडेल अशी खात्री नव्हती. कुरूंद्याच्या दुसऱ्या बाजुला शिरडशहापूरचे पोलीस ठाणे होते. हे ठाणेही तेवढेच जुलमी आणि उडविण्याच्या दृष्टीने आवश्यक होते. शिरडशहापूर वसमत-औंढा मुख्य रस्त्यावरील एक महत्वाचे जहागिरीचे गांव. सरहद्दीपासून चाळीस पंचेचाळीस मैल आत. येथील लोकसंख्या साधारणपणे तीन-साडेतीन हजार असावी. या भागातही रझाकार आणि पोलीस यांनी मिळून बराच धुडगुस घातला होता. येथून जवळच असलेल्या गुंडा गावी तर अत्याचाराचा कहर झाला होता. तेथे मोठ्या संख्येने शस्त्रास्त्रासह जाऊन त्यांनी सारे गांव पेटवून दिले होते. सात गावकऱ्यांना ज्यात एक स्त्री आणि एक तान्हे मुलही होते, अत्यंत अमानुषपणे ठार मारले होते (आज या जागेवर शासनाने बांधलेले हुतात्मा स्मारक उभे आहे.) अशा उत्पाती कृत्याची दखल घेणे आवश्यक होते.

शिरडचे पोलीस ठाणे उध्वस्त करण्याचे स्वातंत्र्यसैनिकांनी ठरविले त्यामागे आणखी एक महत्वाचा उद्देश होता. तो म्हणजे सीमापार झालेले स्वातंत्र्यसैनिक निझामी हद्दीत थेट पन्नास मैलपर्यंत आंत घुसून हमरस्त्यावरच्या पोलीस ठाण्यावर जोरदार तडाखा मारु शकतात हे त्यांना सिध्द करुन दाखवून निझामी सत्तेला जबरदस्त हादरा द्यावयाचा होता. १८ जून १९४८ शनिवारी अमावस्येच्या गडद काळोखात मध्यरात्री बरोबर बारा वाजता ही यशस्वी कारवार्या करण्यात आली.

शिरडशहापूर गांव सरहद्दीपासून जवळ पास पन्नास मैल आत असल्यामुळे प्रत्यक्ष कारवायीच्या एक दिवस अगोदर निवडक वीस-बावीस स्वातंत्र्यसैनिक गंगाप्रसाद अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली वाटेवरच्या पांगराशिंदे गावालगतच्या माळात येऊन थांबले. वसमतचे नागोबा अल्लासटवार, नारायण मास्तर, राजाराम निशानकर, कुरूंद्याचे किशन तेली, हिरामण इळवी, रावण महाजन, सिताराम सूतार, वापटीचे बहिर्जी शिन्दे, बापुराव शिन्दे, भाऊराव, गंगाराम, कोंडिबा, सिंदगीचे राजाराम मगर, जवळाबाजारचे नारायण, अप्पामाळी इत्यादी स्वातंत्र्यसैनिक या कारवायीत सामील होते. येथील सर्वच ग्रामीण परिसर पूर्ण परिचित, ओळखीचा आणि जिव्हाळ्याचा. प्रसादजींनी याच भागात भूमिगत चळवळीचे केंद्र कित्येक दिवस चालविले होते. सुखदुःखाच्या त्या आठवणी ताज्या होत्या. लोकांना खबर लागताच ते धावत पळत माळात आले. भरभरुन भेटले. जीवाभावाच्या गप्पागोष्टी झाल्या. पांगराशिंदेच्या लोकांनी तर रात्रौ आग्रहपूर्वक चांगले गोडधोड खाऊपीऊ घातले.

१८ जूनची पहाट आता उजाडली होती. सुरुवातीला भल्यासकाळी बाजार जवळ्याच्या नारायण आणि अप्पा माळीला पोलीस ठाण्याची संपूर्ण माहिती काढून आणण्याच्या दृष्टीने गुप्तहेर म्हणून रवाना करण्यात आले. शनिवारचा दिवस म्हणजे शिरडचा आठवडी बाजार . बाजाराला आल्याचे निमित्त करुन ते दोघे दिवसभर पोलीसठाण्याच्या अवतीभवती घिरट्या घालीत बारीक निरिक्षण करीत राहीले. काम आटोपून संध्याकाळी परत फिरले. त्यांनी आणलेल्या माहितीनूसार त्यादिवशी ठाण्यावर फक्त तीन पोलीस होते आणि त्यांचेजवळ एक आवाजी तीन बंदुका होत्या. हल्याच्या दृष्टीने एकूण परिस्थिती स्वातंत्र्यसैनिकांना बरीच अनुकुल वाटली.

लगेच स्वातंत्र्यसैनिक शिरडशहापूरच्या रोखाने झपाझप पावले टाकीत

निघाले. नेहमीप्रमाणे बहिर्जी आघाडीवर राहून मार्गदर्शन करीत होता. पांगरा शिन्देच्या माळातून शिरड गाव आठ दहा मैलावर. रस्ता इथून तिथून सर्व डोंगराचा. शिवाय सोबतीला अमावस्येचा दाट काळोर .. पावसाळी काळ्या ढगांनी अधिकच गडद केलेला. अंधारात ठेचकाळत, खरचट ा, धावतपळत सर्व सैनिक गावाजवळ आले. रात्र बरीच आली होत ी. कुत्री भूंकत होती. गावाच्या दिशेने एखाद-दुसरा दिवा मिणमिणत होता. रातकिड्यांनी आपले संगीत अधिकच रौद्र - भीषण केले होते. रात्र भेसूर, भयाण वाटत होती.

एका झाडाजवळ सर्व जमले. पोलीस ठाण्यावर हल्ला चढविण्याची योजना समजावून सांगण्यात आली. शस्त्रे अगदीच तुटपुंजी होती. एक स्टेनगन एकच एक आवाजी रायफल, दोन पिस्तुले, कांही छोटे हात बॉंब एवढ्या अपुऱ्या सामग्रीच्या आधारावर निझामी पोलीस ठाण्यावर हल्ला करावयाचा होता. कांही सहकारी घाबरले. कां कूं करु लागेल. शस्त्राशिवाय रिकाम्या हातानी यावे कसे ? आणि येऊन करावे तरी काय ? असे रास्त प्रश्न त्यांनी उपस्थित केले. कच खाल्लेल्या सहकाऱ्यांना बरोबर घेणे केव्हाही इष्ट नव्हते. त्यांना तेथेच झाडावर चढून थांबण्यास सांगण्यात आले. निशस्त्र सैनिकाजवळ गोफनी होत्या. त्यांना खिशात दगडधोंडे भरुन घेण्याचा आदेश देण्यात आले.

पावसाची बुरबुर आता सुरु झाली होती.विजा चमकत होत्या. अधूनमधून कडाडत होत्या. वादळीवारे सैरभैर भणाणत होते.... लख्खकन विजेचा प्रकाश पडला आणि समोर अक्राळ विक्राळ आ वासून असलेली एक जमीन पातळी बरोबरची विहीर जनरेस पडली. योगायोगाने मृत्यूपंथाला लागलेले पाऊल थबकले. नियती आणि निसर्ग निश्चितच आपल्या बाजुने आहे याची जाणीव झाली. पावले आता अधिक निर्धारपूर्वक पडू लागली. गावात प्रवेश झाला तेंव्हा कुठे तरी गावातल्या घड्याळ्यात बरोबर बाराचे ठोके पडत होते.

पोलीस ठाणे पुरुषभर उंच असलेल्या एका ओटयावर वसलेले होते. ओट्यावर जाण्यासाठी चंगल्या चारपाच पायऱ्या होत्या. ओट्यावरचा बराच मोठा भाग मोकळा होता. एका बाजुला एक खोलीवजा ठाण्याची इमारत होती. तिच्या तीन बाजुला भिंती असून समोरचा भाग उघडखांबी मोकळा होता.

शस्त्रे सावरीत नागोबा अलसटवार, बहिर्जी शिंदे ठाण्याच्या पायऱ्यांना भिडले. बाकीचे लोक अवतीभवतीने आडोसा आसरा घेत पुढे सरकू लागले....

पोलीस स्टेशनमध्ये कंदिलाचा मंद प्रकाश पडला होता. तीन चार पोलीस शिपाई गाढ निद्रेत पहुडले होते. पहाऱ्यावर कोणाी दिसत नव्हते. सर्वत्र भयाण शांतता पसरली होती.

पुढे भिडलेल्या स्वातंत्र्यसैनिकांनी धडाधडा गोळ्या झाडल्या. झोपलेले सर्व शिपाई खडबडून जागे झाले. धडपडत उठून सैरावैरा पळू लागले. जीवाच्या आकान्ताने ओरडू लागले. शस्त्रास्त्र चाचपण्याची वृथा, वांझोटी खटपट करु लागले. काळ आणि वेळ एकत्र आल्यामुळे त्यांचे सारे प्रयत्न, सारी धडपड निरर्थक ठरली. स्वातंत्र्यसैनिकांनी गोळ्यांच्या अखंड वर्षाव करुन त्या सर्व पोलीसाचे तेथेच मुडदे पाडले. रक्ताच्या लाल रंगात विजयश्री रंगून गेली.

त्याचवेळी पोलीस ठाण्याकडे येणारे गावातील सर्व रस्ते रोखून धरण्यात आले. गोळीबाराची चौफेर धमाल उडवून देण्यात आली. त्यामुळे आता गावातून इतर कोणी प्रतिकार करण्यास येण्याची सूतराम शक्यता उरली नाही. सर्व स्वातंत्र्यसैनिक अगदी निर्धास्त बनून बिनदिक्कपणे ठाण्याच्या इमारतीत घुसले. तेथील सर्व बंदुका, काठ्या, आणि भिंतीवरील एक मोठे घड्याळ आरामशीरपणे काढून घेऊन बाहेर पडले. ( हे घड्याळ या कारवायीची आठवण म्हणून हुतात्मा बहिर्जी स्मारक शिक्षण संस्थेच्या वापटी येथील शाळेत आजही जतन करुन ठेवण्यात आले आहे.)

कारवायी संपूर्णपणे यशस्वी ठरली होती आता एका अरुंद गल्लीतून गावाबाहेर पडायचे होते. रस्त्याच्या दोन्ही बाजुला घराच्या रांगा होत्या. घराघरात लोक जागे झाले होते पण सर्वत्र चिडीचिप्प वातावरण होते. विनाकारण कुणाला त्रास देण्याचा स्वातंत्र्यसैनिकांचा अजिबात उद्देश नव्हता. आम जनतेच्या स्वातंत्र्यासाठी आणि उत्थानासाठी लढणारे ते धर्मनिरपेक्ष कॉंग्रेसी संघटनेचे सच्चे सैनिक होते.....

हवेत बंतूकीचे आवाज काढीत आणि 'स्टेट कॉंग्रेस-झिंदाबाद' 'स्वामी रामानंद तीर्थ की-जय ' अशा गगनभेदी घोषणा देत ते त्या अरूंद गल्लीतून गावाबाहेर पडले. सुरक्षितपणे संकेतस्थळी पोहचले. झाडावर थांबलेल्या आपल्या इतर सर्व सहकाऱ्यांना बरोबर घेऊन माळाच्या दिशेने परतीची वाटचाल करु लागले.

पाठलाग होण्याची मुळीच शक्यता नव्हती. शिरडशहापूर गाव मोटार सडकेवर असले तरी त्यावेळच्या भारतीय सरहद्दीपासून पन्नास मैल आंत होते. स्वातंत्र्यसैनिक काँग्रेसी लोक कायमचे पा पलीकडे भारतीय हद्दीत पळून गेले आहेत अशी निझामी पोलीसांची धारणा होती. पन्नास मैल आंत शिरून हल्ला होईल असे त्यांना कधी स्वप्नातही वाटले नसावे. त्यामुळे जवळपास जादा लष्करी कुमक असण्याचा संभव नव्हता. दुसरे म्हणजे मोटरमार्ग आणि रेल्वेमार्ग सोडून आडमार्गाने अपरात्री जाण्याला निझामी पोलीस तेव्हा सहसा धजावत नसत. माळात पाय ठेवणे तर त्यांना शक्यच नव्हते.

मोहीमेच्या यशाच्या मस्तीत स्वातंत्र्य सैनिकांनी रात्रभर माळ तुडविला. झुंजूमुंजू होण्याच्या सुमारास जवळ्याच्या नारायण नावाच्या सैनिकाच्या पायाला विंचवाने डंख मारला. असह्य वेदनामुळे त्याला चालणे अशक्य झाले. तेव्हा कुणीतरी त्याला पाठकुळी घेतले. दिवस उजाडताना सर्व स्वातंत्र्यसैनिक माळपायथ्याच्या एका मळ्याजवळ आले त्यांच्या अंगावरील खाकी गणवेश पाहून मळ्यातील पोराटोरांनी घाबरुन गावात धूम ठोकली. गावात खबर पोंहचताच गावातील बायका मुले, माणसे भीतीने जंगलात सैरावैरा पळू लागली. वापटीचे बहिर्जी शिन्दे आणि बापुराव शिन्दे यांनी परिस्थिती जाणली. प्रसंगावधान राखून अंगावर नेहमीचे कपडे चढविले. ते गावात जाऊन गावकऱ्यांना भेटले. गावकऱ्यांनी त्यांना ओळखले. जीवाभावाच्या भेटीगाठी झाल्या, गावकऱ्यांच्या आनंदाला पारावार राहीला नाही.

वापटीच्या परिसरातील ते गाव म्हणजे डोंगराच्या कुसीत वसलेली एक आदीवासी आंध लोकांची वाडी होती. लगतच्याच एका ओढ्यावर प्रातर्विधी उरकून स्वातंत्र्यसैनिक माळाच्या अंर्तभागात जाण्यास निघाले. गाव मागे टाकून कांही अंतर ते चालूनही गेले. तेवढ्यात आंधवाडीतील ते गरीब, अडाणी, भोळेभाबडे पण प्रेमळ आंध लोक गरमागरम भाकरी घेऊन त्यांच्यामागे धावत आले. कुणी खमंग लोणच्याचे गाडगे आणले तर कुणी थंडगार स्वच्छ पाण्याने भरून घागर आणली. चुलीजवळच्या ऊन ऊन, मऊ मऊ भाकऱ्यांची तर चळतच्याचळत जमा झाली. एक सुरेख सकाळ उगवली. सकाळची गोड न्याहारी आटोपून स्वातंत्र्यसैनिकांनी माळ गाठला.

स्वातंत्र्यसैनिक पन्नास मैल आत घुसून निझामीसत्तेवर प्रचंड प्रहार करू

शकतात ही गोष्ट शिरडशहापूरच्या पोलीस ठाण्यावरील सशस्त्र कारवायीने सिध्द केली. निझामी शासन या कारवायीने हादरुन गेले.

आसमन्तातील रझाकारांनी शिरडच्या या तिखट कारवायीबद्दलचा आपला सारा राग पुढे पांगरा शिन्दे गावावर काढला. एके दिवशी रझाकारांची झुंडच्या झुंड पांगरा गावात आली. कॉंग्रेसच्या लोकांना मदत करणारा, त्यांना गोडधोड खाऊ घालून त्यांचे लाड करणारा गाव म्हणून त्यांनी येथील लोकांना अमानुष मारझोड केली. त्यांची मालमत्ता लुटली. त्यांच्या घराना आगी लावून दिल्या. एवढेच नव्हे तर गावातील दोन व्यापारी शंकरलाल व मोहनलाल मुरक्या यांची निर्घृण हत्या केली. बाबाराव शिन्दे नावाचा एक निधड्या छातीचा माणूस आडवा आला म्हणून त्याला गोळी मारून रडविले. पांडोजी पाचपुते या नेमबाजीत प्रवीण असलेल्या शिकारी आणि बंदुकधारी आदीवासी आंध तरूणाचा गावात शिरता क्षणी गोळी घालून काटा काढला. पांगरा शिन्दे गावाने स्वातंत्र्याच्या पवित्र यज्ञवेदीवर अशा तऱ्हेने आपला हर्विभाग अर्पन केला. त्याचे सतत स्मरण ठेवून देशप्रेमाची प्रेरणा देणारे 'हुतात्मा स्मारक' आज या गावाच्या प्रवेश रस्त्यावर उभे आहे.

एकूण परभणी जिल्ह्याच्या भूमिगत सशस्त्र आंदोलनाला या काळात विलक्षण गति प्राप्त झाली होती. सीमेलगतच्या निरनिराळया ठिकाणावर जिल्ह्याच्या निरनिराळ्या केंद्रानी कधी स्वतंत्रपणे तर कधी एकमेकांच्या मदतीने वारंवार हल्ले केल्यामुळे येथील निझामशाही नाकी आणि नियंत्रण संपूर्णपणे उठून, उधळून गेले होते. सीमा बरीच मोकळी झाली होती. स्वातंत्र्यसैनिकांची टेहळणी पथके या भागात राजरोसपणे अहोरात्र फिरत होती. या सर्व भागात नागरिकांची संरक्षण आणि स्वयंशासन दले स्थापन करण्यात आली होती. स्वातंत्र्यसैनिकांच्या कुशल मार्गदर्शनाखाली ही दले आपापल्या गावचा सर्व कारभार चोखपणे पहात होती.

वाघजाळी, वलाणापिंपरी, तळणी, बामणी इत्यादी परभणी जिल्ह्याच्या महत्वाच्या संयुक्त कारवायामध्ये एक उत्कृष्ट नेमबाज म्हणून तसेच आघाडीचा शूर आणि धाडसी सैनिक म्हणून वसमत तालुक्यातील वापटीचा बहिर्जी शिंदे ख्यातकिर्त झाला होता. त्याचा सहभाग फार मोठा आणि महत्वाचा होता.

६

# आजेगावचा रणसंग्राम बहिर्जींचे बलिदान

आजेगावचा रणसंग्राम बहिर्जी शिन्देच्या जीवनातील शेवटचा रणसंग्राम ठरला. या संग्रामात त्याला वीरमरण प्राप्त झाले. तो या संग्रामाचा खराखुरा नायक ठरला.

स्वातंत्र्यवीरांच्या या भूमिगत सशस्त्र आंदोलनाने सरहद्दीलगतच्या प्रदेशात फार मोठे कार्य केले होते. सीमेलगतच्या निझामी हद्दीतील जवळपास पाच-सात मैलाचा पट्टा या आंदोलनाने संपूर्णपणे मुक्त केला होता. निझामी पोलीसांची किंवा रझाकारांची या भागात फिरकण्याची हिम्मत होत नसे. या भागातील अनेक छोट्या मोठ्या गावातील रझाकार, करोडगिरीचे शिपाई, निझामी पोलीस मागे हटून आतल्या भागातील मोठ्या खेड्यात एकवटले होते. अशा मोठ्या खेड्यातून जमा झालेले हे उपरे अत्याचारी त्या त्या खेड्यातील सर्वसामान्य जनतेचा छळ करीत असत. त्यांच्या मालमत्तेवर, अब्रूवर आणि जीवावर घाला घालीत असत. सर्वसामान्य जनतेला गाव सोडून जाण्याचीही मनाई असे. निमुटपणे अन्याय अत्याचार सहन करीत जगावे लागे. असे गुलामीचे जिणे जगणारी दुर्दैवी जनता स्वातंत्र्यसैनिकांची अत्यंत आपुलकीने वाट पहात असे. त्यांच्या वाटेकडे डोळे लावून बसत असे. कारण स्वातंत्र्यसैनिक त्यांना साक्षात मुक्तिदाते वाटत. त्यांच्यावाचून दुसरा कोणी आपल्यावरील संकट निवारण करणार नाही असा

त्यांना विश्वास वाटे.

आजेगांव हे असेच एक दुर्दैवी गाव होते. सरहद्दीपासून सात-आठ मैल आत असलेले त्यावेळच्या हिंगोली तालुक्यातील (आता सेनगाव तालुक्यात) तीन-साडेतीन हजार लोकवस्तीचे हे गांव. स्वातंत्र्यसैनिकांनी हुसकून लावलेल्या रझाकारांचा फार मोठा अड्डा तेथे जमा झाला होता. शिवाय निझामी गोलीसांची संख्याही मोठी होती. या सर्वांनी मिळून गावातील सर्वसामान्य जनतेला जिणे नकोसे करून टाकले होते. लोक अतिशय त्रासले होते. भयंकर गुलामगिरीचे लाजिरवाणे जिणे ते जगत होते.

स्वातंत्र्यसैनिकांच्या कानावर या गावच्या करूण किंकाळ्या नित्य येत होत्या. त्याबरोबरच रझाकारांचे मुकाबल्याचे मग्रूर आव्हानही येत असे. हे आव्हान स्वीकारण्याचे स्वातंत्र्यसैनिकांनी ठरविले. आजेगाववर संयुक्तपणे एक जोरदार सशस्त्र हल्ला करून रझाकारांची मस्ती जिरविण्याची आणि तेथील लोकांना त्यांच्या भयंकर जाचातून मुक्त करण्याची एक गुप्त योजना निश्चित करण्यात आली.

१८ जुलै १९४८ ला परभणी जिल्ह्याच्या चारही केंद्रावरील निवडक शंभर स्वातंत्र्यवीर हिंगोली तालुक्याच्या व्याड स्वातंत्र्यसैनिक केंद्रावर जमा झाले. दिवसभर गावात गर्दी होती. केव्हा आणि कोठे जावयाचे याची कल्पना प्रमुख नेत्याशिवाय इतर कोणालाच नव्हती. प्रत्येक जण आदेशाची वाट पहात होता. हिंगोली तालुक्याचे बाबूराव जामकर, चंद्रकांत पाटील आणि त्यांचे अनेक सहकारी भोजनाची व्यवस्था करण्यापासून लढ्याची योजना आखण्यापर्यंत अखंड धडपडत होते. 'करेंगे या मरेंगे' असा भाव जमलेल्या प्रत्येक वीराच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे तळपत होता.

रात्रीचे भोजन झाले. शस्त्रास्त्रांचे वाटप करण्यात आले आणि थोड्याच वेळात कूच करण्याचा आदेश देण्यात आला. शस्त्रास्त्रांनी सज्ज, गणवेश चढवलेली जवळजवळ शंभर सैनिकांची एक छोटीसी सेना एका पाठीमागे एक शिस्तबद्धरितीने पावले टाकीत आजेगावच्या रोखाने वाटचाल करू लागली. शस्त्रास्त्रे परभणी जिल्ह्याच्या चारही केंद्रावरुन एकत्र जमा करुन आणलेली बऱ्यापैकी होती. पण त्यापेक्षाही उरातील आवेश अभंग स्वरूपाचा होता. हा आवेश गप्प बसू देत नव्हता. होती येईल त्या साधनाने दैत्यरुपी दुष्ट दुश्मनाचा चेंदामेंदा

करण्याची अतिशय उत्कट लालसा मनात निर्माण करणारा हा आवेश होता. शत्रूच्या नरडीचा घोट घेण्याची तहान या आवेशात होती. कांही जण चांगली शस्त्रे घेऊन तर कांहीजण केवळ लाठ्याकाठ्या घेऊन, गोफनी आणि दगडधोंडे हातात घेऊन निघाले होते.

हिंगोली तालुक्यातील सैनिकांना हा भाग चांगला परिचयाचा झाला होता. हा भाग केवळ त्यांच्या तालुक्याचा भाग होता म्हणून नव्हे तर गेले वर्षभर अनेक रात्री हा भाग त्यांनी आपल्या पायाखाली तुडविला होता. ते लोक मार्गदर्शन करीत होते. शिवाय बहिर्जीसारखा एक चाणाक्ष आणि धाडसी वाटाड्या बरोबर होताच. तो देखील आघाडीला राहून आपल्या शास्त्रोक्त ज्ञानानूसार वाटांचे अचूक अंदाज घेत पुढे चालत होता. बाकीचे सैनिक त्याच्या मागोमाग झपाझप पावले टाकीत चालत होते. वातावरणात भयाण शांतता होती. पायातील रबरी बूटांचा विशेष आवाज होत नव्हता. अंगातील खाकी गणवेष ढगाळ अंधारात एकरूप झाले होते.

वाटेत एक लहानसे गाव लागले. तेथे थोडा वेळ थांबण्याचा आदेश मिळाला. कुजबूज सुरु झाली. चौकशी केल्यानंतर समजले की या मोहिमेची बातमी शत्रूला लागली आहे व शत्रू जय्यत तयारीनिशी मार्गप्रतिक्षा करीत आहे. बातमी फोडण्याचे हे पातक करणाऱ्या संशयित द्रोह्यांना त्या गावात दोरांनी करकचून बांधून टाकण्यात आले होते. लोक त्यांना मारझोड करीत होते. क्षणभरच काय करावे ? असे प्रश्नचिन्ह उभे राहीले. 'करेंगे या मरेंगे' च्या अविच्छिन्न निर्धाराने शेवटी सर्व संशय छिन्नविछिन्न केले.

'आगे बढो ' चा आदेश जाहीर करण्यात आल. सेना आपल्या लक्ष्याकडे निघाली. तीच गती, तोच उत्साह, तोच निर्धार. मृत्यू समोर साक्षात उभा असताना कुणाच्याही अंतःकरणात भीतीचा लवलेशही नव्हता. अठरा तारीख संपून एकोणीस तारीख सुरु झाल्याचे कोणाच्या लक्षातही आले नाही. काळ आपल्या गतीने पुढे जात होता. सैनिक काळावर मात करण्यासाठी आसुसले होते. मधूनच ढगाळ आकाशात विमानाची घरघर ऐकू आली. कुणीतरी म्हणाले 'पाकिस्तानातून शस्त्रे घेऊन विमान हैदराबादला जात आहे.' विमानाचा हा क्रम गेले कित्येक दिवस सुरु असल्याचे जगजाहीर होते. विमानाच्या घरघरीची फारशी दखल घेण्याचे कारण नव्हते. मोहीम आपल्या लक्ष्याच्या जवळजवळ येऊन थडकली

होती.

सकाळी पाच साडेपाचची वेळ असावी. वातावरणात अजून अंधार दाटलेला होता.त्या अंधारातूनही दूरवर असलेल्या आजेगाव गावाच्या अस्पष्ट खुणा जाणवत होत्या. सारे गाव गाढ निद्रेत पहुडल्यासारखे वाटत होते. क्वचित कुठे घरात जात्यांची घरघर सुरु झाली होती. मधूनच एखादा कोंबडा आरवत असल्याचे कानावर येई. बाकी सर्व गावावर संपूर्णपणे भेसूर, भयाण शांततेची कळा पसरल्यासारखी वाटत होती.

शत्रू सावध झाल्याची बातमी अगोदरच लागली होती. शिवाय रझाकार आणि पोलीसांची संख्याही भरपूर असावी अशी कल्पना होती. त्यांच्या मदतीला निझामी सैन्याचे घोडेस्वार आल्याचीही एक बातमी होती.

आजेगाववर दोन बाजूनी हल्ला चढविण्याचा निर्णय तातडीने घेण्यात आला. एका तुकडीने समोरच्या बाजूने हल्ला चढवित गावात घुसायचे व दुसऱ्या तुकडीने त्याचवेळी पिछाडीला जाऊन शत्रूला मारीत त्यांची कोंडी करायची असे ठरले. त्याप्रमाणे सर्व सैनिकांची झटपट दोन तुकड्यात विभागणी झाली. पुन्हा एकदा सर्वांना योग्य त्या सूचना थोडक्यात समजावून सांगण्यात आल्या. एक तुकडी पिछाडीने हल्ला करण्यास बाजूने वळली. दुसऱ्या तुकडीने समोरून हल्ला चढवला. या समोरच्या तुकडीत गंगाप्रसाद अग्रवाल यांचे नेतृत्वाखाली प्रामुख्याने वसमत तालुक्याचे स्वातंत्र्यसैनिक आघाडीवर होते. बहिर्जी व त्याचे रणझुंजार बहाद्दर साथीदार अगदी पुढ्यात जाऊन पोंहचले होते.

पूर्व दिशेला किंचित लाली फाकत होती.समोरच्या तुकडीने पहिली गोळी झाडली. तात्काळ गावातून त्यास प्रत्यूत्तर आले. याचा अर्थ शत्रू सावध होता. समय बाका होता.लढाई जोखमीची होती. पण कुणीच डगमगला नाही. भ्याला नाही.

शत्रूने गावाच्या मुख्य वेशीचे दार बंद केले होते. वेशीला लागून दोन्ही बाजुला मातीच्याच घरांची लांबलचक सलग रांग होती. त्यामुळे गावाचा कोट तयार झाला होता. शत्रूने अगोदरच घरांच्या भिंतींना भोके पाडून त्यात बंदूकीच्या नळ्या घालून ठेवल्या होत्या. त्या नळ्यामधून नुसती आग आग बरसत होती. गोळ्यांचा वर्षाव होत होता. शत्रूने लढाईचा असा हा सुरक्षित पवित्रा घेतला होती.

याउलट स्वातंत्र्यसैनिक संपूर्णपणे उघड्या मैदानात होते. वेशीपासून दोन तीनशे फूटावर एक तळे होते. हे तळे रणमैदान बनले. या तळ्याच्या पाळूचा आसरा घेऊन लार्यींग पोझीशनमध्ये स्वातंत्र्यसैनि ांनी चढाई सुरु केली. पायाचा कांही भाग तळ्याच्या पाण्याशी खेळतो आहे. ड तळ्याच्या पाळूवर टेकले आहे. गावाच्या दिशेने बंदुका रोखून लढाई सुरु आहे. समोरून शत्रूकडून येणाऱ्या बंदुकीच्या गोळया डोक्यावरुन सूं S सूं करीत तळ्याच्या पाण्यात विसावत आहेत... पण त्याची तमा कुणालाही नाही. बहुतेक सैनिकांच्या डोक्यावर लोखंडी शिरस्त्राणे आहेत. मान वर करून ते समोरच्या शत्रूला हेरीत आहेत. त्यांच्यावर अचूक मारा करीत त्यांना टिपीत आहेत... अशी लढाईची एकच धुमश्चक्री सुरु झाली...

आता थोडे उजाडले होते. दुर्बिनीने पाहिल्यास गावाच्या पिछाडीला स्त्रिया, वृद्ध, मुलें गाव रिकामे करीत असल्याचे दिसायला लागले. बोचके बाचके, डोक्यावर वाहून नेण्यासारखे बोजे घेऊन शेकडो स्त्री-पुरुष सुरक्षित वाटेने गावाबाहेर पळून जाण्याचा प्रयत्न करीत होते. समोरच्या कांही झाडावरून बंदुकीचा धूर निघताना आढळला.झाडावरही कांही शत्रू दबा धरून बसले होते. त्यांचाही गोळीबार सुरु होता.

समोरची गावाची मुख्य वेस आता स्पष्ट दिसत होती. वेशीच्या दोन्ही बाजूंना दोन गावठी तोफा शत्रूने अगोदरच भरून ठेवल्या होत्या. त्या तोफा डागण्सासाठी हाती पेटता पलिता घेऊन आणि पत्राच्या एका दरवाजाचा आडोसा करून एक शत्रुसैनिक समोर आला. स्वातंत्र्यसैनिकांनी त्याला पाहिले. पहिली तोफ त्याने कशीबशी उडविली. आगीचा भडका झाला. दारुगोळा दूरवर फेकला गेला. पण नुकसान झाले नाही. अगदी समोर असलेली दुसरी तोफ डागण्यसाठी तो आता आणखी पुढें सरकला त्याचवेळी बेभान होऊन, तळ्याच्या पाळूचा आसरा सोडून, कळमनुरी तालुक्याचे डिगाजी आढेकर बेधडकपणे शस्त्र रोखून त्याला ललकारत पुढे सरसावले. मारोती निराळी, फुलाजी आलगुंडे त्यांच्या मागे धावले. दुसऱ्या बाजुने नागोबा दारेवार, नारायण मास्तर, बहिर्जी शिंदे तूफान मारा करू लागले. या सर्व कोलाहलाने भयंकर भेदरून तो पलितेवाला सूसाट वेगाने माघारी पळाला. मोकळ्या मैदानात आलेले उसळत्या रक्ताचे तरणेबांड तरूण सैनिक आता मोठ्या त्वेषाने ओरडत आणि गोळीबार करीत वेशीच्या दारावर धडका देऊ लागले. शत्रूने आपली सर्व शक्ति आता उघड्या

मैदानात आलेल्या या तरुणावर एकवटली. दोन्ही बाजुंनी गोळ्यांचा पाऊस पडू लागला. गोळ्याच्या अखंड वर्षावात सूर्य बराच वर आल्याचे कोणाच्या लक्षातही आले नाही. रायफल, स्टेनगन शर्थीची लढाई लढत होती. हा तुंबळ रणसंग्राम विजयश्री आपल्याकडे खेचण्यासाठी असेल तेवढे सामर्थ्य मुक्तपणे उधळत होता.

याच वेळी शत्रूच्या एका गोळीने डिगाजी आढेकरांचा मांडीचा वेध घेतला. दुसऱ्या गोळीने फुलाजीची पिंढरी फोडली. मारोती निराळीच्या अंगावर तर गोळ्याचा वर्षाव झाला. दोन तीन गोळ्या त्याच्या शरीराला इकडून तिकडून चाटून गेल्या. हे सर्व शूर स्वातंत्र्यसैनिक, रणांगणात जबर जखमी होऊन पडले. डिगाजी आढेकर तर थेट शत्रूच्या पुढ्यात जाऊन जखमी होऊन पडला.

रणांगणाचा रंग क्षणाक्षणाला बदलत होता. तरीही एकीकडून नारायण मास्तर, नागोबा दारेवार, तर दुसरीकडून बहिर्जी शिंदे गोळ्याचा अचूक मारा करीत आघाडी लढवित होते.जखमी सैनिकांना त्यांच्याच अंगाने हळुहळु सरपटत सुरक्षितपणे मागेमागे येण्यास मोलाची मदत करीत होते. शेवटी सर्व जखमींना सुरक्षितपणे मागे घेण्यात यश मिळाले.

दुर्दैवाची गोष्ट म्हणजे याचवेळी शत्रुला नीट हेरण्यासाठी बहिर्जीने आपल्या डोक्यावरील हेलमेट (लोखंडी शिरस्त्राण) थोडे बाजूला सरकविले आणि काळाने डाव साधला... शत्रुपक्षाची एक भयंकर गोळी सूं S सूं करीत आली आणि तिने नेमका बहिर्जीच्या डोक्याचा वेध घेतला..... बहिर्जी आपल्या बहाद्दर साथीदारांना हात वर करून इशारा देत तेथेच कोसळला......

बहिर्जीच्या रायफलने आतापर्यंत शत्रूला हैराण करून सोडले होते. म्हणूनच त्याची अकरा गोळ्या एकामागे एक झाडणारी रायफल शत्रूच्या माऱ्याचे मुख्य केंद्र बनली होती. बहिर्जी पडला आणि लगेच त्याच्या शेजारच्या सिताराम सुताराने त्याच्या हातातील रायफल आपल्या हाती घेऊन त्याचे कार्य पुढे चालू ठेवले.

आता रणांगणाचा रंग पालटला होता. दारुगोळा संपत आला होता. सतत तीन चार तास चाललेल्या गोळीबारात दारुगोळा तरी किती साथ करणार.

या वेळेपर्यत दुसऱ्या बाजुने गावात शिरण्याचा प्रयत्न करणारी दुसरी तुकडी कांही विशेष चाहूल समोरच्या बाजूने लागत नाही म्हणून परत येऊन मिळाली होती.

मोहिमेचे नेते गंगाप्रसाद अग्रवाल या सर्व परिस्थितीवर लक्ष ठेवून होते.त्यांनी आता परतीचा आदेश दिला. मरणाची चिन्ता कोणालाच नव्हती. शत्रूच्या अपवित्र हाताचा शरीराला स्पर्श होता कामा नये असे प्रत्येकाला वाटत होते. म्हणूनच रणांगणात घायाळ होऊन बेशुद्ध अवस्थेत पडलेल्या धिप्पाड बहिर्जीला माघारी आणण्याचा मुख्य प्रश्न आता निर्माण झाला होता. अशा आणीबाणीच्या वेळी बाबूराव कणेवार आणि राजाराम निशानकर पुढे सरसावले. त्यांनी पोटावर सरपटत बहिर्जीचा देह हातावर घेऊन सुरक्षित स्थळी आणला. लहानशा चुकीसाठी प्राणाचे मोल देण्याचा प्रसंग होता. पण या प्रसंगातून ते मोठ्या धैर्याने आणि हुशारीने आले. सैनिक माघार घेत असल्याचे बघताच शत्रूच्या बंदूका आगीचा वर्षाव वाढत्या उत्साहाने करीत होत्या. गावाच्या बाहेर मोकळ्या मैदानात येण्याचे धैर्य मात्र त्यांना अखेरपर्यंत झाले नाही. गोळीबाराच्या धूमधडाक्याने बाबूराव कणेवाराचे कान कायमचे बधीर झाले.

प्राण धोक्यात घालून त्या दोघांनी बहिर्जीला शेजारच्या निमजग्याजवळ (प्रार्थनास्थळ) आणले. निममजग्याच्या आश्रयाला इतर दहा बारा जण ताटकळत थांबले होते. बहिर्जीचे निश्चेष्ठ शरीर तेथे आणले गेले. नागोबा दारेवार आणि नारायण मास्तर अजूनही मैदान लढवीत होते. त्यांच्याजवळच्या रायफलीची काडतुसे केंव्हाच संपली होती.रायफलीचा नेम धरावयाचा आणि पिस्तुलाची गोळी झाडावयाची असे मुत्सद्देगिरीचे तंत्र आता त्यांनी अवलंबिले होते. शत्रू घाबरत होता. शत्रूला शेवटपर्यंत त्यांनी गावाबाहेर येऊ दिले नाही. थोड्यावेळानंतर ते दोघेजण दोनशे फुटाचे अंतर पोटावर सरपटत गोळीबाराच्या अखंड वर्षावात सुरक्षित स्थळी येऊन पोहचले.

बहिर्जीची जखम कापडाने घट्ट बांधण्यात आली. बहिर्जीला वर्मी गोळी लागली होती. भयंकर रक्तस्राव होत होता. बहिर्जीची शुद्ध गेली होती. त्याच्यावर तातडीने वैद्यकीय इलाज होणे आवश्यक होते. त्यासाठी त्वरित सरहद्द गाठणे जरुरी होते.

आता प्रश्न होता बहिर्जीला न्यावे कसे ? कसदार शरीराचे बाबूराव जामकर पुढे सरसावले. त्यांनी बहिर्जीला खांद्यावर घेतले. त्यांच्याबरोबरचे इतर सैनिक पाठीमागे गोळ्या झाडीत निघाले. व्याडच्या रस्त्याला लागले. पुढे एक खेडे लागले. तेथून एक बाज झटपट मिळविण्यात आली. घायाळ बहिर्जीला बाजेवर घेऊन सर्वजण तातडीने धावत पळत निघाले. व्याडला येऊन पोहचले.

बहिर्जीची स्थिती अधिकाधिक गंभीर होत होती. प्रयत्न करूनही फारसे कांही साधेल असे वाटत नव्हते. सर्वांचे चेहरे काळवंडले होते. रात्रभर उसंत नसल्याची खंत कोणालाच नव्हती. कांहीही करून बहिर्जीला वाचविण्याची आटोकाट धडपड सर्वजण करीत होते.

एक मोटार मिळविण्यात आली. सैनिक घायाळ बहिर्जीला घेऊन मोटारीच्या दिशेने निघाले. बहिर्जीला अधिक उपचारासाठी तातडीने मोटारने वाशिमला दवाखान्यात नेण्याची धडपड चालली होती. पण मोटारजवळ पोहचण्याच्या अगोदरच वाटेवर कुठे तरी बहिर्जीचा आत्मा अनंतात विलीन झाला होता. निझामी सरहद्द सोडून स्वतंत्र भारतीय प्रदेशात प्रवेश केल्यानंतरच बहिर्जीने शेवटचा श्वास सोडला होता. बहिर्जी आपल्या सर्व साथीदारांना सोडून या जगातून निघून गेला होता. अन्याय आणि अत्याचाराविरुद्ध लढता लढता विशाल भारतीय स्वातंत्र्यासाठी बहिर्जीने वीरमरण पत्करले होते. देशासाठी बहिर्जी हुतात्मा झाला होता.

बहिर्जीचा मृतदेह वाशिमला आणून त्यावर सैनिकीपद्धतीने अंत्यसंस्कार करण्यात आले. स्मरण रहावे म्हणून प्रेताचा फोटो काढण्यात आला.बहिर्जीचे मूळ एकमेव तेवढेच छायाचित्र आज उपलब्ध आहे.

वाशिम शहरात प्रचंड अंत्ययात्रा निघाली सर्व स्वातंत्र्यसैनिकांनी बहिर्जीला साश्रू नयनांनी शेवटची सलामी दिली. " दिन खूनके हमारे प्यारो न भूल जाना खुषीयोंमे अपनी हमपर आसू बहाते जाना " - शाहीर प्रभाकर वाईकर यांनी दर्दभऱ्या आवाजात गीत गायीले. बहिर्जीचे धाकटे बंधू रामराव शिन्दे यांनी चितेला अग्नी दिला. चिता पेटली आणि बहिर्जीचा नश्वर देह पंचतत्वात विलीन झाला.

इतर जखमी स्वातंत्र्यसैनिकांना आकोल्याच्या सरकारी इस्पितळात उपचारासाठी दाखल करण्यात आले. कालांतराने ते सर्व दुरुस्त झाले.

भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाच्या इतिहासातील एक सोनेरी पान उलटले गेले. स्वतंत्रतेच्या पवित्र वेदीवर बहिर्जीने स्वतःच्या रक्ताचा अभिषेक केला. बहिर्जी अमर ठरला.

आजेगावचा रणसंग्राम एक ऐतिहासिक महत्वाचा आणि चिरस्मरणीय रणसंग्राम ठरला. त्या संग्रामातून माघार घ्यावी लागली तरी तो संग्राम यशस्वी

ठरला. शेवटपर्यंत धीर कुणाचाच खचला नाही. या संग्रामामुळे निझामी हद्दीतील अधिक गावे मुक्त झाली. शत्रू मागे हटला. त्यानंतर अवघ्या दोनच महिन्याच्या अवधीत भारत सरकारने ''पोलीस ॲक्शन'' घेतली. निझाम शरण आला. हैदराबाद संस्थान मुक्त झाले.

७

# आंदोलनाची यशस्वी सांगता

बहिर्जी गेला पण त्याच्या तेजस्वी बलिदानाने अनेकांना स्वातंत्र्य लढ्याची प्रेरणा दिली. कारण त्यानंतर लढा मंदावला नाही. तो अधिकाधिक प्रखर, तीव्रतर होत गेला. प्रत्येक सैनिकाने असे मानले की बहिर्जीचे अपुरे कार्य पूर्ण करावयाचे आहे. त्यासाठी तो अधिक जिद्दीने कार्याला लागला.

स्वतंत्र भारत सरकारनेही त्या काळातील एकूण परिस्थितीचा अधिक गांभीर्याने आणि सखोल विचार केला. निझामी हुकुमशाहीने लोकांची सहनशक्ती तर संपलीच होती. आता भारत सरकारचीही सहनशक्ती संपली. वाटाघाटीचे गुऱ्हाळ खूप झाले होते. निझाम बऱ्याबोलाने वठणीवर येण्याची शक्यता आता संपुष्टात आली होती. हैदराबाद संस्थान निझाम सहजासहजी भारतीय संघराज्यात विलीन करणार नाही आणि त्याचबरोबर तेथील जनतेवरील अनन्वित स्वरुपाचे भीषण अत्याचारही संपणार नाहीत याची भारतीय नेत्याना खात्री पटली होती. त्यासाठी आता कांहीतरी जालीम उपाय योजला पाहिजे असे त्यांना वाटू लागले होते. शेवटी स्वतंत्र भारतीय संघराज्याचे त्या वेळचे प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू आणि गृहमंत्री वल्लभभाई पटेल यांनी खंबीर आणि कठोर भूमिका स्वीकारली. हैदराबाद संस्थान स्वतंत्र करण्यासाठी आणि तेथील जनतेला भयंकर छळवणूकीतून संपूर्णपणे मुक्त करण्यासाठी लष्करी कारवायी करण्याचा निर्णय तत्कालीन नेहरुजींच्या केन्द्रीय मंत्रीमंडळाने घेतला.

१३ सप्टेंबर १९४८ला सकाळी चार वाजता भारतीय सेनेने चारही दिशांनी

हैदराबाद संस्थानात प्रवेश केला. जनरल चौधरीजींच्या कुशल नेतृत्वाखाली या सेनेने अत्यंत चपळाईने दुष्ट निझामी सत्तेवर तडाखेबंद हल्ले चढवित अतिशय वेगाने विजयाची घोडदौड सुरु केली. फारर ा प्रतिकार कुठेच झाला नाही. कारण निझामी सत्तेची ताकत तिच्या सेनेत कधीच नव्हती.ती केवळ कासिम रझवीच्या बेछूट जिभेत आणि रझाकारा च्या गुंडपुंड प्रवृत्तीत होती. कारवायी सुरु झाली या नुसत्या बातमीनेच निझामी सत्ता जेथल्या तेथे ढेपाळली. रझाकार अर्धमेले झाले. अवघ्या चार दिवसात संबंध संस्थान पादाक्रांत करून भारतीय सेना राजधानी हैदराबादच्या वेशीवर येऊन थडकल्या. सतरा तारखेला सायंकाळी बरोबर पाच वाजता निझाम बिनशर्त शरण आला. अवघ्या १०९ तासात नकली निझामी सत्तेचा पोकळ डोलारा कोसळला. सारा खेळ खलास झाला.

अशा तऱ्हेने इतिहासातील एक काळा कालखंड समाप्त झाला. हैदराबाद संस्थान मुक्त झाले. स्वतंत्र, विशाल भारतीय संघराज्यात विलीन झाले. लोक अक्षरशः आनंदाने बेभान होऊन नाचले.

१५ ऑगष्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला पण भारतांतर्गत असलेल्या हैदराबाद संस्थानच्या दुर्दैवी जनतेला स्वातंत्र्याचा हा सोनियाचा आनंददायक दिवस पाहण्यासाठी पुढे तब्बल तेरा महिने वाट पहावी लागली. एवढेच नव्हे तर त्यासाठी या तेरा महिन्याच्या कसोटीच्या काळात अनंत हालअपेष्टा भोगाव्या लागल्या. खडतर तपश्चर्या करावी लागली. आंदोलनाचे तूफान उठवावे लागले. हैदराबाद संस्थानची आणि पर्यायाने आपल्या मराठवाड्याची ही दुर्दैवी जनता खऱ्या अर्थाने १७ सप्टेंबर १९४८ रोजी स्वतंत्र झाली.

शूर बहिर्जीने या स्वातंत्र्यासाठी हौतात्म्य पत्करले. आजेगावच्या समरांगणात बहिर्जीच्या त्या तेजस्वी बलिदानाचे प्रेरक स्मरण करून देणारा विशाल किर्तीस्तंभ आज उभा आहे. बहिर्जीचे चिरंतन स्मरण रहावे म्हणून परभणी जिल्ह्यात हुतात्मा बहिर्जी स्मारक शिक्षण संस्था स्थापन करण्यात आली आहे. श्री. बापूरावजी भोसले आणि श्री.बापूरावजी शिन्दे या जोडगोळीने मिळून १९५० साली बहिर्जीच्या जन्मगावी वापटी येथे एक शाळा सुरु करुन या संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. आज ही शिक्षण संस्था शाखोपशाखांनी भरगच्च बहरली आहे.

## बहिर्जी गीत

आकाशातुन एक सूर्य अंधार चिरीत उठला
बहिर्जीच्या बलिदानाने इतिहास नवा घडला !

सत्तेचाळीस साल उगवले
अंग्रेजी साम्राज्य उखडले
भारतीय स्वातंत्र्य प्रकटले
कालरात्रीच्या कराल मिठीतुन मुक्तपंछी फडफडला !

सत्तांतर झाले दिल्लीचे
संस्थानी सत्ताधिषांचे
सरंजामीचे, हुकूमशाहीचे,
हैदराबादी निझाम हट्टी संस्थानिक उरला !

बंधमुक्तीचे वादळ सुटले
संस्थानभर अन् सरसरले
जोर जुलमवाले थरथरले
स्वामी रामानंद मुखातुन कंठ मुक्याना फुटला !

आजेगावच्या रणमैदानी
सत्तांधांना पाजुनी पाणी
झुंज दिली स्वातंत्र्य वीरांनी
लढता लढता शूर बहिर्जी वीरगती पावला !

**प्रा. शाम अग्रवाल**

“ *मायभूमीच्या मुक्तीसाठी रक्त सांडिले ज्यांनी*
*युगायुगातून ठरेल प्रेरक त्यांची अमरकहाणी.....!*”


हुतात्मा बहिर्जींच्या
पावन स्मृतीस
सादर समर्थन

प्रा. शाम अग्रवाल

Bahirji Smarak Mahavidyalaya Basmath :: Dist. Hingoli

LIBRARY COPY

Bahirji Smarak Mahavidyalaya Basamth
Senior College
Dist. Hingoli



आजेगावच्या समरांगणातील समाधीस्थान

LIBRARIAN
B.S.M.Basmath